cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२८१ | सोमवार, दि.३ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये




संपादकीय

## जेवढा दोष प्रशासनाचा तेवढाच भाविकांचाही...


महाकुंभमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीत ३० जणांना प्राण गमवावे लागले. हा सरकारी आकडा असल्यामुळे त्यावर विश्वास ठेवण्याशिवाय पर्याय नाही. कदाचित ही संख्या जास्त असू शकते. मुद्दा हा आहे की एवढे लोक एकाच ठिकाणी एकाच वेळी मृत्युमुखी पडले ते कोणत्या नैसर्गिक आपत्तीमुळे नाहीत, तर मानवी गलथानपणामुळे. हा गलथानपणा तेथील प्रशासनाचा आहे तेवढाच भाविकांचा आहे.

# आता सोयाबीन खरेदीवर प्रशासनाची करडी नजर

## तपासणीसाठी पथके गठीत, मुदतवाढ दिल्यानंतर प्रशासन सतर्क

**मुंबई । प्रतिनिधी**

**सरकारन हमीभावाने सोयाबीन खरेदी करण्याच्या मुदतीत वाढ केली आहे. आता ६ फेब्रुवारीपर्यंत सोयाबीनची खरेदी करता येणार आहे. यानंतर प्रशासन सतर्क झाले आहे. आता हमीभावाने सोयाबीन खरेदीवर प्रशासनाची करडी नजर राहणार आहे. यासाठी पथके गठीत करण्यात आली आहेत.**



सुरु असलेल्या हमीभावाने सोयाबीन खरेदी प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी पथके गठीत करण्यात आली आहेत. ही पथके दररोज अचानकपणे कोणत्याही खरेदी केंद्रावर भेट देवून तेथील सोयाबीन खरेदी प्रक्रियेची तपासणी करणार आहेत. राज्य शासनाने सोयाबीन खरेदीला ६ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ दिली असून, या काळात सोयाबीन खरेदीमध्ये अनियमितता होवू नये, नोंदणीकृत शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी केले जाईल, यासाठी ही उपाययोजना करण्यात आली आहे. सद्या राज्यात सोयाबीनची खरेदी वेगाने चालू असून ३१ जानेवारी नंतर सोयाबीनची खरेदी पुढे काही दिवस चालू राहावी, अशी राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात मागणी होती. त्या अनुषंगाने सोयाबीन खरेदीसाठी आणखी काही दिवस मुदतवाढ मिळावी यासाठी केंद्र सरकारच्या कृषी मंत्रालयाला प्रस्ताव पाठवला होता. तो प्रस्ताव केंद्रीय कृषिमंत्र्यांनी मान्य केला असून सोयाबीन खरेदीला ६ फेब्रुवारीपर्यंत मुदत वाढ दिली आहे. राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी यासाठी पुढाकार घेतला होता.

### राज्याचे उद्दिष्ट पुर्ण करण्यासाठी मदत

या मुदतवाढीमुळे राज्याला दिलेल्या १४,१३,२६९ मेट्रिक टन पीपीएस खरेदी उद्दिष्ट्याला पूर्ण करता येणार असून सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यात नाफेड आणि एनसीसीएफ च्या माध्यमातून ५६२ खरेदी केंद्रावर ३० जानेवारीपर्यंत ४ लाख ३७ हजार ४९५ शेतकऱ्यांकडून ९ लाख ४२ हजार ३९७ मेट्रिक टना पेक्षा अधिक सोयाबीनची खरेदी झालेली आहे.

# नामदेव शास्त्रींपुढे बापासाठी लेक ढसाढसा रडली

## देशमुख कुटुंब भगवान गडावर; भगवान गड देशमुख कुटुंबाच्या पाठीशी–नामदेव शास्त्री

**भगवान गड । प्रतिनिधी**

**सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख आणि संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हे भगवानगडावर दाखल होत त्यांनी महंत नामदेव शास्त्री यांची भेट घेतली. यावेळी वैभवी देशमुख हिने नामदेव शास्त्रींना थेट सवाल करीत बापासाठी लेक नामदेव शास्त्रींपुढे ढसाढसा रडली. तर आरोपीचे समर्थन आम्ही केले नसून भगवान गड देशमुख कुटुंबाच्या पाठीशी असल्याचे यावेळी महंत नामदेव शास्त्री यांनी म्हटले आहे.**



भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी धनंजय मुंडे यांची पाठराखण केली होती. तसेच त्यांनी आरोपींच्या मानसिकतेवरही भाष्य केले होते. त्यानंतर त्यांच्यावर चोहूबाजूने टिकेची झोड उठली गेली. देशमुख कुटुंबाने सुध्दा नामदेव शास्त्रींच्या विधानावर आश्चर्य व्यक्त करीत त्यांची भेट घेणार असल्याचे सांगितले होते. रविवारी देशमुख कुटुंबाने भगवान गडावर जावून नामदेव शास्त्री यांची भेट घेत संतोष खून प्रकरणाचे सर्व पुरावे दिले. यावेळी स्व. संतोष देशमुख यांची कन्या वैभवी हिने आपले दु:ख नामदेव शास्त्रींना सांगितले. यावेळी वैभवी म्हणाली, 'दादा तुम्ही मोठे आहात. तुमच्याकडे न्यायासाठी आलो आहोत. एक चापटी मारली त्यांची मानसिकता काय आहे हे

पान २ वर

### मनोज जरांगेंचा महंत नामदेव शास्त्रींवर हल्लाबोल



सरपंच संतोष देशमुख प्रकरणात भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वातावरण तापले आहे. मनोज जरांगे यांनी नामदेवशास्त्रींवर हल्लाबोल केला. स्वत:ची चूक झाकण्यासाठी डीवचू नका, तुमच्याकडून चूक झाली एका समाजाला बाजूला नेण्याचे काम झाले, असे जरांगे म्हणाले. जातिवादाचा नवा अंक ते देऊन गेले अशी टीकाही जरांगेंनी केली आहे.

### बीड जिल्ह्यात १८३ शस्त्र परवाने रद्द

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर पोलीस प्रशासनाने बीडमध्ये शस्त्र परवाने रद्द करण्याची कारवाई सुरू केली. आतापर्यंत बीड जिल्ह्यात १८३ शस्त्र परवाने रद्द केले आहेत. तर आणखी १२७ शस्त्र परवाने रद्द होणार आहेत. आतापर्यंत ८ जणांनी आत्मसमर्पण करत त्यांच्याकडील शस्त्र पोलिसात जमा केले. पोलिसांनी शस्त्रांचे सर्वेक्षण सुरू केली. परवानाधारकांच्या घरी जाऊन चौकशी सुरू केली. परवानाधारक शस्त्र हाताळण्यास सक्षम आहे का? ते जिवंत आहे का? याची खात्री केली जात आहे. यात अनेक जण मृत असल्याचे समोर आले आहे. त्यांचा आकडा ११८ असल्याचे समजते. त्यामुळे आता हे सर्व परवाने रद्द केले जाणार आहेत.

### देशमुख कुटुंब नगद नारायणाच्या चरणी नतमस्तक

सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाने नारायण गडावर जात रविवारी नगद नारायण महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले आहे. त्यानंतर त्यांनी नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज यांच्याशी फोनवरुन संवाद साधला आहे, लवकरच शिवाजी महाराज मस्साजोग येथे येऊन भेट घेणार असल्याची माहिती धनंजय देशमुख यांनी दिली आहे.

### नामदेव शास्त्रींना दिलेल्या फाईलमध्ये कोणते पुरावे?

१) मुख्य आरोपी सुदर्शन घुले आणि त्याच्या साथीदारांनी संतोष देशमुख यांची कशी हत्या केली? या हत्या प्रकरणाला आवादा पवनचक्की कंपनीकडून मागितलेली खंडणी कशी जबाबदार आहे याचे पुरावे फाइलमध्ये आहेत.

२) विष्णू चाटे आणि वाल्मीक कराड यांचे आणि संतोष देशमुख हत्या प्रकरणातील प्रमुख मारेकरी यांचे कसे संबंध आहेत याचेही पुरावे सदर फाइलमध्ये आहेत.

३) संतोष देशमुख हत्या प्रकरण किती भयंकर होते आणि किती क्रूर पद्धतीने संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली याचे पुरावे महंतांना दाखवण्यात आले.

४) संतोष देशमुख यांचे अपहरण करण्यात आले होते. त्यावेळी धनंजय देशमुख आणि विष्णू चाटेमध्ये काय संवाद झाला याची माहिती देखील धनंजय देशमुख देणार आहेत.

५) संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सुदर्शन घुलेसह त्याच्या साथीदारांनी पवनचक्की प्रकल्पावर अशोक सोनवणे नावाच्या गार्डला कशा पद्धतीने मारहाण केली याचे पुरावे दाखवले.

६) संतोष देशमुख यांना मारहाण करता वेळेस आरोपींकडून व्हिडिओ कॉल करण्यात आला होता. मोकारपंती ग्रुपवर हे व्हिडीओ शेअर करण्यात आले. याचे देखील पुरावे धनंजय देशमुख नामदेव शास्त्री यांच्याकडे दिले.

पान २ वर

# एकनाथ शिंदेंच्या गोटात फडणवीसांचे २५ आमदार

### खा.राऊत यांचा खळबळजनक दावा



**मुंबई । प्रतिनिधी**

**राजकारणात कधी काय घडले याचा काही नेम नाही. मागच्या काही दिवसांपासून राज्यात अनेक गौप्यस्फोट खळबळजनक दावे केले जात आहेत. सध्या असाच एक गौप्यस्फोट उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. एकनाथ शिंदे यांच्या गटात मुख्यमंत्री फडणवीस यांचे २० ते २५ आमदार असल्याचा करण्यात आला आहे.**

खा.संजय राऊत म्हणाले, एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रीपद मिळून देखील अजूनही शून्यात असून धक्क्यात आहेत. एक तर निवडणुकीत ५०–५५ जागा कशा मिळाल्या हा त्यांना पहिला धक्का आणि भाजपने, अमित शाह यांनी दिलेला शब्द पाळला नाही हा दुसरा धक्का असल्याचे राऊत यांनी सांगितले. या धक्क्यातून शिंदे कोलमडले असून त्यांची सरकारमध्ये कोंडी झाली आहे. मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांच्यावर एक झोत होता. तो आता गेला आहे. लोक त्यांच्याकडे जात नाहीत. लोक फक्त पैसे मागायला जातात. यापुढील त्यांचे राजकारण पैसा आणि सत्ता जे आहे त्याच्यावर असून त्यांच्याच आमदारांमध्ये चलबिचल असल्याचे राऊतांनी म्हटले. एका मोठ्या गटावर देवेंद्र फडणवीस यांचे पूर्णपणे नियंत्रण असल्याचा दावा संजय राऊतांनी केला. शिंदे गटाच्या किमान

पान २ वर

## महाकुंभ चेंगराचेंगरी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था


प्रयागराज महाकुंभ मेळयात झालेल्या चेंगराचेंगरीप्रमणी दाखल जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटनुसार, ही जनहित याचिका ३ फेब्रुवारीसाठी सूचीबद्ध करण्यात आली आहे.

उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथे सुरु असलेल्या महाकुंभमेळ्यात २९ जानेवारी रोजी झालेल्या चेंगराचेंगरीत ३० जणांचा मृत्यू झाला होता आणि ६० जण जखमी झाले होते. या दुर्घटनेला जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. सर्व राज्यांना प्रयागराजमधील त्यांच्या सुविधा केंद्रांमध्ये भाविकांना सुरक्षा उपाय आणि मार्गदर्शक तत्त्वांबद्दल मूलभूत माहिती देण्याचे निर्देश देण्यात यावेत,अशी मागणी करणारी जनहित याचिका वकील विशाल तिवारी यांनी दि.३० रोजी सर्वोच्च

पान २ वर

## बीड जिल्ह्यात गेल्या दहा वर्षांत अडीच हजार शेतकऱ्यांच्या आत्महत्या!

### बीड येथे राज्यव्यापी अधिवेशनाचे आयोजन; शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांची बैठक संपन्न




**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात गेल्या १ जानेवारी २०१४ ते ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत म्हणजे गेल्या १० वर्षात २४३२ शेतकऱ्यांनी शेतातील झाडाला ,घरात आडूला गळफास, शेतात विहीरीत उडी घेऊन,विष प्राशन करुन आत्महत्या केल्याची नोंद बीड जिल्हाधिकारी कार्यालयात आहे. राज्य सरकारने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील वारसांना केवळ १ लाख रूपयाची तुटपुंजी मदत दिली आहे. पीडित कुटुंबांचे आजारपण त्यावरील अवाढव्य औषध उपचार खर्च, मुलांचे शिक्षण, सण –उत्सव, दैनंदिन मूलभूत प्रापंचिक गरजा आदि अनेक सांसारिक गोष्टी अर्धवटच आहेत. त्यांचे कायमस्वरूपी पुनर्वसनाचा व

पान २ वर

## आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपन, छत्री, सिमेंट बाकड्यांचे वाटप

**आष्टी । प्रतिनिधी**



माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे यांनी आष्टी शहरातील मार्केट यार्ड परिसरात तीनशेच्या वर विविध जातीच्या वृक्षांचे केले वृक्षारोपण तर कानडी गावामध्ये राजू शिंदे या कार्यकर्त्याने गावात बसवले ५५ सिमेंट ची बाकडे तर आष्टी नगरपंचायत चे स्वीकृत नगरसेवक बाळासाहेब घोडके यांनी शहरांमध्ये गोरगरीब छोट्या फळ विक्रेते व इतर व्यावसायिकांना मोठ्या छत्र्यांची केले वाटप जवळपास वीस व्यावसायिकांना या उन्हाळ्याच्या दिवसात एक




पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३१ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १.०० क्विंटल | २,८५१ | २,८५१ | २,८५१ |
| ज्वारी/हायब्रिड :१६.५० क्विंटल | १,९५० | २,३६० | २,१३५ |
| मका/लोकल:१५.५० क्विंटल | २,१०३ | २,१०३ | २,१०३ |
| तूर : २०६.५० क्विंटल | ६,७३६ | ७,२२२ | ७,०४२ |
| उडीद : ८.०० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ३.५० क्विंटल | २,४६८ | २,४६८ | २,४६८ |
| मुग : २.५० क्विंटल | ७,१४० | ७,२०० | ७,१७० |
| सोयाबीन: ११९.५० क्विंटल | ३,८०० | ४,०५० | ३,९४१ |
| हरभरा: १५.५० क्विंटल | ४,८०१ | ५,५०१ | ५,१५१ |

# राज्यातील ७८.४० टक्के शाळांमध्ये संगणक सुविधा!

## 'असर' च्या अहवालाला राज्य सरकारच्या शिक्षण विभागाचे उत्तर

**मुंबई । प्रतिनिधी**

**असर अर्थात प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन या संस्थेने शाळा सर्वेक्षणाचा (ग्रामीण) अहवाल प्रकाशित केलेला आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत 'असर' अहवालाबाबत काही मुद्दे स्पष्ट करण्यात आले आहेत. संस्थेने २०.४ टक्के विद्यार्थ्यांकडून संगणकाचा वापर होत असल्याचे अहवालामध्ये म्हटले आहे. तथापि, एकूण १,०८,१४४ शाळांचा विचार करता संगणकाचा वापर करण्याचे प्रमाण ७२.९५ टक्के इतके आहे. सदर संस्थेने ४८.३ टक्के शाळांमध्ये संगणक नसल्याचे नमूद केले आहे. वास्तविकत: एकूण शाळांपैकी ७८.४० टक्के शाळांमध्ये संगणक सुविधा उपलब्ध आहे. मुलींकरिता साधारणत: ९६.८ टक्के इतक्या शाळांमध्ये स्वच्छतागृहांची उपलब्धता असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.**




असर अर्थात प्रथम या संस्थेने ४०९ प्राथमिक व ४६३ उच्च प्राथमिक व त्यावरील अशा ग्रामीण भागातील एकूण ८७२ शाळांचे सर्वेक्षण केले आहे. युडायस डाटा सन २०२३-२४ अनुसार राज्यामध्ये एकूण १,०८,१४४ शाळा आहेत. प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन या संस्थेने एकूण शाळांच्या केवळ ०.८१ टक्के इतक्या शाळांचेच सर्वेक्षण केलेले आहे. तसेच राज्यातील एकूण २,०९,६१,८०० शालेय विद्यार्थ्यांपैकी केवळ ३३,७४६ मुलांचे सर्वेक्षण संस्थेने केले आहे जे की एकूण विद्यार्थ्यांच्या केवळ ०.१६ टक्के इतके आहे. या आधारांवर अहवाल प्रकाशित केलेला आहे. या संस्थेने प्रकाशित केलेल्या अहवालामध्ये बरेच महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. त्यामध्ये वय वर्ष ६ ते १४ मधील ६०.९ टक्के बालके ही शासकीय शाळांमध्ये

पान २ वर

### शाळाबाह्य मुलांचे प्रमाण ०.४ टक्के

सन २०२४ मध्ये तीन वर्षाच्या पूर्व प्राथमिक शाळेमध्ये नोंदणी असणाऱ्या मुलांचे प्रमाण ९५ टक्के आहे, २०२२ मध्ये हे प्रमाण ९३.९ टक्के होते. महाराष्ट्रात ६ ते १४ वयोगटातील पटनोंदणी दर गेल्या ८ वर्षांपासून ९९ टक्के पेक्षा जास्त आहे. महामारीच्या काळात शाळा बंद असूनही, २०१८ मधील ९९.२ टक्के वरून एकूण पटनोंदणीचे आकडे २०२२ मध्ये ९९.६ टक्के पर्यंत वाढले आहेत आणि २०२४ मध्ये सुध्दा स्थिर असल्याचे दिसून आले. म्हणजेच या वयोगटातील शाळाबाह्य मुलांचे प्रमाण ०.४ टक्के आहे, जे की देशभरात १.९ टक्के आहे, अशी माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

cmyk

## अग्रलेख

# जेवढा दोष प्रशासनाचा तेवढाच भाविकांचाही...

महाकुंभमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीत ३० जणांना प्राण गमवावे लागले. हा सरकारी आकडा असल्यामुळे त्यावर विश्वास ठेवण्याशिवाय पर्याय नाही. कदाचित ही संख्या जास्त असू शकते. मुद्दा हा आहे की एवढे लोक एकाच ठिकाणी एकाच वेळी मृत्युमुखी पडले ते कोणत्या नैसर्गिक आपत्तीमुळे नाहीत, तर मानवी गलथानपणामुळे. हा गलथानपणा तेथील प्रशासनाचा आहे तेवढाच भाविकांचा आहे.

भाविकांच्या श्रद्धेला बोल लावण्याचे कारण नाही. मात्र, भाविकांनीही जरा संयम बाळगत कृती केल्या आणि जबाबदारीने वागण्याचा प्रयत्न केला तर अशा अनेक घटना टाळता येऊ शकतात. तथापि, धार्मिक ठिकाणी गेल्यावर भाविकांचा संयम संपतो. ते भगवंताच्या चरणी लीन होण्यासाठी एवढे उतावीळ होतात की त्यांचा इहलोकाचा प्रवास संपवत परलोकाचीच ते वाट धरतात. त्यांच्या पातळीवर जसा हा अतिश्रद्धा आणि अति उतावळेपणा त्यांच्यासकट अन्य सर्वांना जाचदायक ठरतो तसाच प्रशासनाचा गलथानपणाही अंतिमत: मुळावर उठतो. कुंभमेळ्यात बुधवारी झालेली घटना पहिली आणि एकमेव नाही. सातत्याने अशा घटना घडत आल्या आहेत. त्यात चाळीस-पन्नास लोकांचा बळी जातो आणि काही क्षणांची हळहळ व्यक्त करून मागच्या पानावरून पुढे सुरू राहते. कुंभ दुर्घटनांमध्ये आतापर्यंत झालेल्या एकूण मृत्यूंचा आकडा काढायचा झाला, तर तो हजाराच्या वर जातो. त्यातून धडा काय घेतला याचा विचार करायची वेळ येते तेव्हा उत्तर शून्य हेच असते. प्रत्येक वेळी केलेल्या मोठमोठ्या दाव्यांच्या विपरीत कुठेतरी काहीतरी त्रुटी राहिलेलीच असते. कुठे ढिसाळपणा तर कुठे अंगवळणी पडलेला बेशिस्तपणा असतो.

महाकुंभ सुरू होण्यापूर्वीच त्याची प्रचंड प्रसिद्धी झाली होती. मुळात महाकुंभ हा असा प्रकार आहे की हिंदू धर्मीयांना त्याचे वेगळे महत्त्व जाहिरातबाजी करून सांगण्याची गरज नाही. त्यातही मौनी अमावास्येला आणि अन्य वेळा होणारे पवित्र स्नान आणि त्याचे धार्मिक महत्त्व हे जुन्याजाणत्या लोकांपासून ते आजच्या सोशल मीडियाच्या पिढीपर्यंत सगळ्यांनाच चांगलेच ठाऊक आहे. दर कुंभमेळ्याला मग तो प्रयागराजचा असो अथवा नाशकातील तेथे लाखोंच्या नव्हे तर करोडोंच्या संख्येने भाविक येतात. आताही प्रयागराज महाकुंभला ४० कोटी भाविक येणार अशी वदंता होती व ते खरेही आहे. जर एवढी गर्दी होणार आहे, तर त्याचे नियोजन त्या प्रकारचे झाले आहे का, याचा विचार कोणी करायचा. दुर्घटना घडल्यावर प्रत्येक वेळी तत्कालीन कारण पुढे केले जाते. अचानक गर्दी उसळली किंवा भाविकांनी अचानक धाव घेतली वगैरे सांगितले जाते. तेवढे सांगून गेलेले जीव परत येत नाहीत. गर्दी होणारच आहे व तिचा अंदाजे आकडा किती असेल याची आपल्याला अगाऊ कल्पना असून आपणच ती संख्या कौतुकाने सांगत असू तर एवढ्या लोकांचा प्रवास सुकर आणि सुखरूप होईल इतपत आपली यंत्रणा सक्षम आणि सज्ज आहे का, याचा अदमास कसा लागत नाही.

गर्दीचे योग्य व्यवस्थापन करण्यात यंत्रणा कमी पडली हा एकच निष्कर्ष दुर्घटना घडल्यावर काढता येतो. कुंभमेळ्याच्या ठिकाणीच काही दिवसांपूर्वी आग लागल्याची घटना घडली. त्याची फारशी चर्चा झाली नाही. भीतीचे वातावरण पसरू नये किंवा अफवांचे पेव फुटू नये म्हणून ही खबरदारी घेतली असेल. घटना घडल्यानंतर तब्बल १७ तासांनी किती लोकांचा मृत्यू झाला व किती जण नेमके जखमी झाले हे सांगण्यात आले. लगेचच आकडा जाहीर केला असता तर कदाचित अधिक हानी झाली असती हेही समजून घेता येते. मात्र पहिल्यांदाच जेव्हा आगीची घटना घडली तेव्हा त्रुटी राहिल्या आहेत याचा तो ट्रेलर होता याची जाणीव तेव्हा झाली नव्हती का? ती जर झाली असती तर मौनी अमावास्येची संभाव्य गर्दी ध्यानात घेऊन योग्य तयारी केली गेली असती किंवा करता येऊ शकली असती. एक गोष्ट लक्षात घेण्याची गरज आहे ती म्हणजे महाकुंभ असल्यामुळे शहर आणि नदीचा परिसर काही विस्तारणार नाही. तो जेवढा आहे तेवढाच राहणार आहे व गर्दीचा जेवढा भार सोसण्याची त्याची क्षमता आहे तीही तेवढीच राहणार आहे. अचानक संपूर्ण शहराच्या लोकसंख्येच्या पाचपट किंवा सहापट गर्दी तेथे अवतरली तर एवढ्या लोकांना सामावून घेणार तरी कसे? रेल्वे, बस, विमान, खासगी वाहने अशा सर्वच माध्यमातून प्रयागराजकडे गर्दीचा ओघ सुरू आहे. महामार्गही तुंबले आहेत. तेथे अडकलेल्या प्रत्येकाला वेगवेगळ्या अडचणींचा सामना करावा लागला. देशाच्या कानाकोपर्यातून ही गर्दी आली आहे. लोकांनीही संभाव्य स्थितीचे आकलन करूनच धाव घेतलेली बरी असते. केवळ कुंभमेळ्याच्याच ठिकाणी नाही तर अन्य सर्वच धार्मिक ठिकाणांनाही हे लागू होते व सगळ्यात महत्त्वाचे असते ते म्हणजे संयम आणि स्वयंशिस्त. भारतातील धार्मिक ठिकाणी होणार्‍या दुर्घटनांबाबत कायम एकच सत्य आहे की त्या ठिकाणी पोहोचल्यावर जो गोंधळ तेथे पाहायला मिळतो तो श्रद्धेसोबत सबुरी ठेवल्यावरच दूर करता येऊ शकतो. तो वैयक्तिक पातळीवरच करता येईल, प्रशासनाकडून अपेक्षा ठेवण्यात अर्थ नाही.

## ह.भ.प.शांतीब्रम्ह नवनाथ बाबा यांच्या हस्ते ५० फूट (पोकलेन) येलारचे उद्घाटन



**वडवणी । प्रतिनिधी**

परिस्थितीशी दोन हात करून नियतीला झुकवण्याचा संघर्ष करून यश मिळवणारे खरे विजेते असतात सोन्याचा चमचा तोंडात घेऊन आलेल्यांचे गोडवे गाण्यात अर्थ नसतो व्यक्ती शून्यातून विश्व निर्माण करून शकतो. परिस्थिती अनुकूल असताना यशाचे टप्पे गाठणे तसे सोपे काम परंतु नेमकी त्याच्या उलट प्रतिकूल परिस्थितीतून व्यवसायात गाठलेले एखादा टप्पा हा इतरांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरक ठरू शकतो. एक मूर्तीमंत उदाहरण म्हणजे वडवणी येथील नामांकित गोविंद अशोक लांडे यांनी दि.०१/०२/२०२५ रोजी नवीन पोकलेन खरेदी केली. आणि दुसऱ्याचं दिवशी दि.०२/०२/२०२५ शनिवार रोजी पोकलेनचे उद्घाटक म्हणून ह.भ.प. शांतीब्रम्ह नवनाथ बाबा गोरक्षनाथ टेकडीकर तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञानेश्वरी प्रवक्ते अर्जुन महाराज खाडे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख विनयक बाप्पा मुळे, महादेव भाऊ जमाले यांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. तर उपस्थित मान्यवर पांडुरंग आप्पा लांडे, नरहरी वटाणे, आत्माराम जमाले बाळासाहेब जाधव, हरी राठोड, रावसाहेब राठोड, डिगांबर लांडे, अशोक लांडे, मोहन भोसले,अशोक व्हायभट, सुखदेव वटाणे, आण्णा सावंत, तुकाराम लांडे हनुमंत कदम, दादासाहेब कदम, शिवाजी कदम, शहाजी कदम, दत्ता कदम, विलास राकुसले, श्रीहरी वटाणे, रवि लांडे गणेश लांडे पत्रकार संभाजी लांडे इ. मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सभापती राम शिंदे आणि जगज्जेत्या खो-खो खेळाडूंच्या सत्काराचे आयोजन

### कार्यक्रम स्थळाची आ.सुरेश धस यांनी केली पहाणी

**आष्टी । प्रतिनिधी**

**दि.५ फेब्रुवारी २०२५ रोजी खुंटेफळ साठवण तलाव थेट पाईपलाईन कामाची पाहणी आणि श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव येथील समाधी मंदिराचे गाभारा बांधकामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाराष्ट्र विधान परिषदेचे नवनियुक्त सभापती ना.प्रा.राम शिंदे आणि जागतिक खो-खो स्पर्धेमध्ये जगज्जेतेपद मिळवलेल्या भारतीय संघातील सहभागी असलेल्या महाराष्ट्र राज्यातील महिला व पुरुष संघातील खेळाडूंचे आणि त्यांच्या प्रशिक्षकांचे भव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी दिली याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की**

आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या खुंटेफळ साठवण



तलावाच्या थेट पाईपलाईन कामाची पाहणी आणि श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव येथील समाधी गाभारा भूमिपूजन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते होणार असून याच कार्यक्रमाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे सभापती पदी निवड झालेले प्राध्यापक राम शिंदे यांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे विधान परिषद हे वरिष्ठ सभागृह असून या सभागृहाचे सभापती पदी आपल्या परिसरातील लोकप्रतिनिधीची निवड झाली आहे याचा आनंद म्हणून या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे खुंटेफळ साठवण तलाव येथे शिंपोरा तालुका कर्जत येथून उजनी धरणाचे पाणी थेट पाईपलाईन द्वारे येणार असून या पाईपलाईन कामाची पाहणी आणि संपूर्ण भारत देशातून दरवर्षी भाविक भक्त मोठ्या प्रमाणावर दर्शनासाठी येत असतात असे प्रसिद्ध क्षेत्र असलेले श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ समाधीस्थळ असलेले मायंबा येथील समाधी मंदिराचे गाभाऱ्याचे नव्याने बांधकाम होणार असून या बांधकामाचे भूमिपूजन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे हस्ते होत असून या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे नवनियुक्त सभापती प्राध्यापक राम शिंदे जलसंपदा मंत्री डॉक्टर राधाकृष्ण विखे पाटील यांचे सह अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून यानिमित्ताने प्राध्यापक नामदार राम शिंदे यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे खुंटेफळ साठवण तलाव हा आपला ड्रीम प्रोजेक्ट असून आष्टी आणि पाटोदा तालुक्यातील काही भागातील शेतकऱ्यांना शेती सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी मराठवाड्याच्या हक्काचे ५.६८ टीएमसी पाण्यापैकी सध्या १.६८ टीएमसी मंजूर असून या प्रकल्पाद्वारे २८ हजार हेक्टर सिंचन होणार असल्यामुळे संपूर्ण आष्टी तालुक्याचे लक्ष या प्रकल्पाकडे लागून आहे दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी होणाऱ्या या कार्यक्रम स्थळाची पाहणी आमदार सुरेश धस यांनी केली असून त्यांचे संपूर्ण कार्यकर्ते या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कामाला लागल्याचे दिसून येत आहे सुमारे एक लक्ष जनसमुदाय या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावा यासाठी जय्यत तयारी सुरू आहे.



## रेशनचा काळ्या बाजारात जाणारा १० लाखाचा तांदूळ पकडला

**जालना । प्रतिनिधी**

२ फेब्रुवारी रोजी सकाळी गोपनीय माहिती वरून माजलगाव येथून नागपूर येथे राशनचा तांदूळ काळा बाजारात जात असल्याची माहिती पोलिस निरीक्षक सुरवसे यांना मिळाली त्यावरून वाटूर फाटा येथे नाकाबंदी करून ट्रक क्रमांक - -२३ ९३९३ ही पकडून पाहणी केली असता त्या मध्ये तांदूळ मिळून आल्याने नायब तहसीलदार पुरवठा विभाग परतूर दादमिया शेख यांना समक्ष घटनास्थळी पाहणी करून अहवाल सादर केला आहे, सदर ट्रक मध्ये ३० टन राशनचे तांदूळ किंमत १०,५०,०००/- आणि ट्रक किंमत ३० लाख असा एकूण- ४०,५०,०००/- चा मुद्देमाल मिळून आल्याने गुन्हा नोंद करून कारवाई करण्यात आली आहे, वाहन चालक राजेंद्र बळीराम पोटेकर रा. सिपगाव ता. गेवराई आणि क्लिनर अमोल रावसाहेब उबाळे रा. वरखेड ता. शेवगाव तसेच ट्रक मालक आणि राशन तांदूळ चे मालक असे ४ आरोपी चे विरुद्ध गुन्हा नोंद करून कारवाई केली आहे, सदरचा मुद्देमाल हा परतूर येथील शासकीय गोडाऊन मध्ये जमा करण्यात आला. सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल, उपविभागी पोलीस अधिकारी परतुर दादहरी चौरे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुरवसे, दादामिया शेख, नायब तहसिलदार परतूर. विठ्ठल केंद्रे, पो.उप.निरिक्षक , राऊते पो. उप. निरीक्षक, सफौ/ नंदू खंदारे , पोह/ किरण चव्हाण, पोका/ नरेंद्र चव्हाण, भगवान खालापूरे ऑपरेटर, चालक पोह/ धोत्रे यांनी केली आहे.

## चंपावती महोत्सवातील चित्रकला, रांगोळी स्पर्धेत जिल्हाभरातून हजारो बाल कलाकारांचा उत्स्फुर्त सहभाग!

### हजारो बाल कलाकारांनी रेखाटले खा.डॉ.श्रीकांत शिंदेंचे आकर्षक चित्र



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये गतवर्षीप्रमाणे याही वर्षी दि. १ फेब्रुवारी ते९ फेब्रुवारी २०२४यादरम्यान बीड शहरात आठ दिवसीय जिल्हास्तरीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात आले असून काल दि. १ फेब्रुवारी रोजी २०२४ रोजी बीड जिल्ह्यातील १०३ शाळांमधून हजारो बाल कलाकारांनी चित्रकला आणि रांगोळी स्पर्धेत उस्पुर्त सहभाग नोंदवला. चित्रकला स्पर्धेत वयोगट इयत्ता पाहिली ते तिसरी- फुलांची टोपली, वयोगट इयत्ता चौथी ते सहावी- राष्ट्रीय पक्षी मोर आणि वयोगट- इयत्ता सातवी ते दहावी मधील बाल कलाकारांना संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे यांचे चित्र काढण्यासाठी विषय दिले होते. कमालीची गोष्ट सर्व वयोगटातील बाल कलाकारांनी आकर्षक अशे चित्र काढून स्वतःच्या कलेचे दर्शन घडवले यादरम्यानच जिल्हाभरातील ७२ शाळांमध्ये समूह रांगोळी स्पर्धा पार पडली असून बाल कलाकारांनी एकत्रित येऊन शाळेच्या प्रांगणात माझ्या शाळेची ईमारत हा विषय घेऊन उभेउभ रांगोळी काढली. कौतुकाची गोष्ट म्हणजे बाल कलाकारांनी शाळेच्या प्रांगणात उभेउभ काढलेली शाळेच्या ईमारतीची रांगोळी पाहून शाळेचे संस्थाचालक, प्राचार्य तथा शिक्षक भावुक झाली कारण या रांगोळीतून विद्यार्थ्यांचे स्वतःच्या शाळेवर असलेले प्रेम दिसून आले. चित्रकला आणि रांगोळी स्पर्धा संपन्न होत असताना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिनभैय्या मुळूक स्वप्नील गलधर आणि चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे तथा अमोल गायकवाड, अनिकेत कांबळे, प्रबुद्ध कोरडे यांनी विविध शाळेत भेटी दिल्या. विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांचे अभिनंदन केले.

### “ डॉ.श्रीकांत शिंदेंनी मानले बीडच्या बाल कलाकारांचे आभार!

बीडमध्ये संपन्न होत असलेल्या आठ दिवसीय जिल्हास्तरीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकारंडकातील चित्रकला स्पर्धेत बीडच्या हजारो बाल कलाकारांनी संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे यांचे हुबेहूब आणि आकर्षक रेखाटल्याने खा. डॉ श्रीकांत शिंदे यांनी बीडमधील बाल कलाकारांचे कौतुक करत आभार मानले आहेत. याबरोबरच शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिनभैय्या मुळूक स्वप्नील गलधर यांनी देखील सर्व शाळांनी चित्रकला, आणि रांगोळी स्पर्धेत आपल्या कलेचा अविष्कार दाखवून खा. डॉ श्रीकांत शिंदे यांच्यावर आपल्या चित्रातून प्रेम व्यक्त केल्याबद्दल आभार मानले आहेत.

## आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त आज कडा येथे वसंत हंकारे यांचे व्याख्यान

**आष्टी । प्रतिनिधी**



**आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार व माजी राज्यमंत्री सुरेश आण्णा धस यांच्या वाढदिवसानिमित्त कृषी उत्पन्न बाजार समिती कडा यांच्या वतीने वसंत हंकारे यांचे व्याख्यान आज सोमवारी सकाळी अकरा वाजता बाजार समिती आवारात आयोजित केले आहे. तरी या व्याख्यानाचा परिसरातील नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, सचिव हनुमंत गळगटे यांनी केले आहे.**

दरवर्षी आमदार धस यांच्या वाढदिवसानिमित्त कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने विविध लोकउपयोगी कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. यावर्षी भरकटलेली तरुणाई व न समजलेले आईबाप समजून घेताना या विषयावर वसंत हंकारे यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. हृदयस्पर्शी असे व्याख्यान असून या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन सभापती तांबोळी व सचिव गळगटे यांनी केले आहे.

## पान १ वरून...

### नामदेव शास्त्रींपुढे बापासाठी

तुम्ही म्हणाला. आज वडिलांच्या अंगावर इतके वार झाले. त्यांचे एकही अवयव नाही की तो शाबूत होता. त्यांच्या अस्थित तीन हाडे निघाली. आमची मानसिकता काय असेल. त्यांचे फोटो बघवत नाही. याचे दुख आहे. तुम्ही आमचे विचार, आमची बाजू, कारण काय, घटना काय एवढेच आमचे एकदा ऐकायला हवे होते', असे ती म्हणाली. आम्हाला न्याय हवा असल्याचेही ती म्हणाली. दरम्यान, यावर नामदेव शास्त्री म्हणाले, आरोपींना माफ करणार नाही. आम्ही आरोपीला पाठी घालत नाही. बाबाच्या गादीवर बसून शब्द देतो. आरोपीच्या पाठी भगवान गड नाही. संतोष देशमुख यांच्या कुटुंबाच्या मागे भगवान गड राहणार आहे. तुम्ही चिंता करू नका. तुम्ही गडाचे आहात. कुठे तरी जातीय रंग दिला आहे, असेही ते म्हणाले.

---------------

### नामदेव शास्त्रींना दिलेल्या

७) खंडणी प्रकरणातील आणि हत्या प्रकरणातील आरोपी एकच असल्याचा देखील पुरावा देखील देशमुख कुटुंबाने दिला आहे.

८) संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाच्या अगोदर हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सुदर्शन घुलेसह खंडणी प्रकरणातील आरोपींची झालेल्या बैठकीचे देखील पुरावे महंतांकडे दिले आहेत

९) मंत्री धनंजय मुंडे यांना हत्या प्रकरण आणि खंडणी प्रकरणात का जबाबदार धरले जाते यासंदर्भातील देखील काही गोष्टी महंत नामदेव शास्त्री यांच्यासमोर मांडल्या आहेत.

१०) संतोष देशमुख यांच्या हत्येच्या नंतरचा शवविच्छेदन रिपोर्टमधील मारहाणीचा फोटो सोशल माध्यमांवर व्हायरल झाला आहे. तो देखील महंतांना दाखवला.

११) मकोका कारवाई आणि खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि मंत्री धनंजय मुंडे यांची व्यवसायामध्ये असलेली भागीदारी याचे देखील पुरावे नामदेव शास्त्रींकडे दिले आहेत.

१२) आरोपी वाल्मिक कराड याला वाचवण्यासाठी मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडून प्रयत्न केला जात आहे. असा आरोप होतोय. धनंजय मुंडे मंत्री असल्याने तपास यंत्रणेवर ते दबाव देत आहेत.

-------------

### एकनाथ शिंदेंच्या गोटात

२० ते २५ आमदारांच्या गटावर भाजपचे नियंत्रण आहे. हे आमदार फडणवीस किंवा अमित शाह यांच्या सांगण्यावरून सूरतला गेले होते. ते एकनाथ शिंदे यांच्यासाठी गेले नव्हते. आजही या गटावर फडणवीस यांचे नियंत्रण आहे. तर, उरलेल्या आमदारांमध्ये चलबिचल आहे. आपण पुन्हा मागे फिरायचे का असा एक विचार शिंदे गटात सुरू असल्याचा दावा संजय राऊत यांनी केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

------------

### बीड जिल्ह्यात गेल्या दहा वर्षांत

आत्मसन्मानाचा ठोस कृती कार्यक्रम निश्चित करण्यासाठी येत्या दि.२२ व २३ मार्च २०२५ रोजी दोन दिवसीय राज्यव्यापी अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. रविवारी दि.२ फेब्रुवारी रोजी बीडच्या शासकीय विश्रामगृहात यासंदर्भात शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांची व्यापक बैठक संपन्न झाली. सदर अधिवेशनासाठी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहाण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शेती विषयातील तज्ञ मान्यवर, शेतकरी चळवळीतील नेते, कृषी विद्यापीठातील कुलगुरू यांना निमंत्रित करण्याचे ठरविण्यात आले. अधिवेशनात राज्यात घडलेल्या संपूर्ण शेतकरी आत्महत्यांची श्वेतपत्रीका प्रकाशित करुन शेतकरी आत्महत्यांचा कलंक पुसण्यासाठी महत्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात येणार आहे. या बैठकीला शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे कुलदीप करपे, कृषिभूषण शिवराम घोडके,''आप''चे जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे, पत्रकार अविनाश वाघिरकर, बी.डी. लोणकर, ॲड. योगेश शेळके, ॲड. गणेश मस्के, रामनाथ खोड, रामेश्वर गाडे, सामाजिक कार्यकर्त्या आयेशा शेख, संध्या भोसले, नयना भाकरे, आनंद ढाकणे, पत्रकार दत्ता आजबे, दादासाहेब वाघमारे, लहू गायकवाड, रघुनाथ नावडे आदी उपस्थित होते.

-------------

### महाकुंभ चेंगराचेंगरी प्रकरणी

न्यायालयात दाखल केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर अपलोड केलेल्या खटल्यांच्या यादीनुसार, मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांचे खंडपीठ ३ फेब्रुवारी रोजी तिवारी यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करतील.

-----------------

### आ.सुरेश धस यांचा ५५ वा

प्रकारे निवारा उपलब्ध करून दिला बीड जिल्हा नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला हादरून सोडणारी मसाजोग सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या करणाऱ्यांना जोपर्यंत फाशीच्या शिक्षेपर्यंत पोहोचत नाही तोपर्यंत कसलाही सत्कार घेणार नाही असे जाहीर केल्याने यंदाचा वाढदिवस आमदार सुरेश धस यांनी कुठल्याही कार्यकर्त्यांच्या शुभेच्छा न स्वीकारता केवळ फोन द्वारे शुभेच्छा स्वीकारणार असे जाहीर केल्यानंतर मतदार संघामध्ये अंतर खर्च न करता माझ्या वाढदिवसाच्या दिवशी तुम्ही गावागावात सामाजिक उपक्रम राबवा गोरगरिबांना मदत करा असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी कार्यकर्त्यांना केले होते आष्टी तालुक्यातील चिखली गावामध्ये उदंड आयुष्या साठी महादेवाला अभिषेक कीर्तनाचा कार्यक्रम व सर्व गावकऱ्यांना भोजन देण्यात आले राजश्री शाहू निवासी आपंग विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप देखील उपनगराध्यक्ष शैलेश शस्त्रबुद्धे व बाळासाहेब घोडके यांच्यावतीने करण्यात आले.

--------------

### राज्यातील ७८.४० टक्के

शिक्षण घेत आहेत तर ३८.५ टक्के बालके ही खासगी शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. इयत्ता पहिली व दुसरी मधील वाचन व गणितीय क्रिया यामध्ये विद्यार्थ्यांची संपादणूक व अध्ययन स्तर हा वाढल्याचे दिसून येते. इयत्ता तिसरी मधील पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यामध्ये कोरोना मध्ये झालेला अध्ययन क्षय भरून काढण्यात येत आहे असे दिसून येते. शासकीय शाळांमध्ये सन २०२२ च्या तुलनेमध्ये सन २०२४ मध्ये वाचनामध्ये १०.९ टक्के प्रगती दिसून येते. तर खाजगी शाळांमध्ये वाचनामध्ये ८.१ टक्के प्रगती दिसून येते. गणितीय क्रियांमध्ये शासकीय शाळांमध्ये १३.१ टक्के प्रगती दिसून येते व खाजगी शाळांमध्ये ११.५ टक्के प्रगती दिसून येते. वय वर्ष १५ ते १६ याच्यामध्ये ९८ टक्के विद्यार्थी हे शाळांमध्ये प्रवेशित आहेत. सर्वात कमी शाळाबाह्य विद्यार्थी असणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र हे एक राज्य आहे. वय वर्ष १४ ते १६ मधील विद्यार्थ्यांच्या डिजिटल साधनांची उपलब्धता मध्ये राज्यातील ९४.२ टक्के विद्यार्थ्यांच्या घरी स्मार्टफोन आहे व यातील ८४.१ टक्के विद्यार्थी त्याचा वापर करू शकतात. यामधील १९.२ टक्के विद्यार्थ्यांनी स्वतःचा स्मार्टफोन असल्याचे नमूद केले आहे. यातील ६३.३ टक्के विद्यार्थी हे शिक्षणाच्या संदर्भात स्मार्टफोनचा वापर करतात, तर विविध सामाजिक माध्यमांसाठी ७२.७ टक्के विद्यार्थी स्मार्टफोनचा वापर करतात. असे अनेक मुद्दे असर ने मांडले आहेत.

-----------

cmyk

# राज्यपाल सि.पी.राधाकृषणन यांच्या हस्ते पृथा पाठकचा गौरव

माजलगाव । प्रतिनिधी
नांदेड येथे, “ स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात“ दि २९ जानेवारी रोजी आयोजित दीक्षांत, पदवीदान आणि सुवर्णपदक प्रदान समारंभात, महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल, श्री.सी.पी.राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत कु. पृथा शैलेश पाठक हिला पदवी परीक्षेत बायोटेक्नॉलॉजी विषयात, विद्यापीठात प्रथम आल्याबद्दल गौरविण्यात आले.या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू मनोहर चासकर याच्याहस्ते पृथाला सुवर्णपदक व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.



कु.पृथाचे दहावी पर्यंतचे शिक्षण माजलगाव येथील श्री.सिद्धेश्वर विद्यालयात झाले व पदवीचे शिक्षण तिने लातूर येथील महाविद्यालयात पूर्ण केले.सध्या ती बायोटेक्नॉलॉजी विषयातच पुणे येथे पदव्युत्तर शिक्षण घेत आहे.तिच्या यशाचे श्रेय तिने तिला लाभलेले शिक्षक,आई वडील व आज्जींना दिले.या गौरवाबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. ३ फेब्रुवारी २०२५



# आदित्य ग्रीन कंपनीला पर्यायी जागा द्यावी

## युवा आंदोलनचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



अंबाजोगाई । प्रतिनिधी

**बहुजनांच्या न्याय हक्कांसाठी लढणारी युवा आंदोलन ही संघटना मौजे जवळगाव (ता.अंबाजोगाई) येथील भूमिहीन मागासवर्गीय समाज बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी सरसावली आहे. आदित्य ग्रीन कंपनीला मौजे जवळगाव (ता.अंबाजोगाई) शिवारातील दिलेली गट नं–२११ मधील सरकारी गायरानातील जमिनीचा करार रद्द करून पर्यायी जागा देण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकारी, बीड यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.**

युवा आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अशोक पालके यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी, बीड यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आदित्य ग्रीन कंपनीला मौजे जवळगाव (ता.अंबाजोगाई) शिवारातील दिलेली गट नं–२११ मधील सरकारी गायरानातील जमिनीचा करार रद्द करून पर्यायी जागा देण्यात यावी. कारण, दिलेल्या जमीनीवर भूमीहिन मागासवर्गीयांचे अतिक्रमण आहे. ते मौजे जवळगाव शिवारातील गट नंबर – २११ मधील सरकारी गायरान जमीन ४३ वर्षांपासून पिकवून आमचा उदरनिर्वाह भागवतो सदरील जमीनीवरील अतिक्रमण निलंबित करावे म्हणून आम्ही तहसिलदार, अंबाजोगाई यांना वेळोवेळी अर्ज दिला आहे. आमच्या या जमिनीतील पिकांचे पीक पंचनामे तहसिलदार, अंबाजोगाई यांच्या मार्फत झालेले आहेत व त्या पीक पंचनाम्याचे रेकॉर्ड उपलब्ध आहे. या मधील ०२ वाहितीदारांचे गांव नमुना नंबर ०१ई ला नोंद तहसील कार्यालयाने केलेली आहे. तेही रेकॉर्ड उपलब्ध आहेत म्हणजे वहिती अंमल आहे. सद्य परिस्थिति मध्ये आदित्य ग्रीन प्रा.कंपनी मार्फत सरकारी गायरानातील अतिक्रमणधारक यांच्या उभ्या पिकांचे नुकसान करून त्यांनी मुलाप्रमाणे जपलेली झाडे तोडली जात आहेत. हे सर्व आपल्या महसूल प्रशासन, पोलिस प्रशासन यांना हाताशी धरून धडपशाही केली जात आहे. शासनाची भूमिहीन मागासवर्गीयांसाठी दादासाहेब गायकवड यांच्या नांवाने सबलीकरण योजना राबविली जाते. पण, येथे जे भूमीहीन शासनाची पडीक जमीन पिकून आपला उदरनिर्वाह करतात. त्यांचा ताब्यातील जमिनीवर विकासाच्या नांवाखाली पिकावर नांगर फिरवला जातो. हे पुरोगामी महाराष्ट्राला शोभणारे नाही. तरी याप्रकरणी आपण लक्ष घालून प्रत्यक्ष सर्व पुरावे पाहून आम्हाला न्याय द्यावा सदरील कंपनीला पर्यायी जागा उपलब्ध करून यावी व ज्या महसूल प्रशासनातील अधिकारी कर्मचारी यांनी चुकीचा पंचनामा करून खरी माहिती लपविली त्या अधिकारी, कर्मचारी यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करावी अशी विनंती करून जर शासन व प्रशासन यांनी वरील करार रद्द केला नाही तर युवा आंदोलन संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. त्यास शासन व प्रशासन जबाबदार असेल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर युवा आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अशोक पालके, बेटी बचावचे धीमंत राष्ट्रपाल, माजी सरपंच हनुमंत गायकवाड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदन देताना मौजे जवळगाव (ता.अंबाजोगाई) येथील भूमिहीन मागासवर्गीय स्त्री, पुरूष समाज बांधव उपस्थित होते.

पान ६ वरून...

## पत्रकारांच्या प्रश्नासाठी पुन्हा

पत्रकारिता क्षेत्रात काम करताना माणसे जोडा

याप्रसंगी उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे विशाल परदेशी यांनी पत्रकारिता क्षेत्रात काम करताना माणसे जोडा, असा मोलाचा सल्ला देत सांगितले की, आजच्या कार्यक्रमाला उत्तर महाराष्ट्र, कोकण, मध्य महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा अशा विविध भागातून पत्रकार आलेत. मराठी पत्रकार परिषद या मातृसंस्थेच्या एक भाग आहे, याचा मला अभिमान आहे. ग्रामीण भागातील पत्रकाराकडे जेवढी माहिती असते, तेवढी शहरी भागातील पत्रकारांना नसते. चांगला फिल्ड रिपोर्टर हा उत्तम अँकर होऊ शकतो. बेधडकपणे व्यक्त होण्यास प्राधान्य द्या. असे बोला जे तुमच्या आईला समजेल, असे प्रश्न विचारा जे तुमच्या आईला समजतील. आयुष्यात आपल्याला जमिनीवर आणणारी माणसे असावीत. तरच माणूस माणसात जाऊन उत्तम मिसळू शकेल. पत्रकारिता क्षेत्रात प्रत्येक क्षण स्पर्धेसारखा असतो, आणि या स्पर्धेत आपण टिकणे गरजेचे आहे. पण आपण कोणतीही बातमी देताना शब्दांचे भान फार महत्त्वाचे आहे. घरातील महिला जेव्हा घर सांभाळते, तेव्हाच पत्रकारीतेचे व्यसन पूर्ण होऊ शकते. तसेच पत्रकारिता करताना आरोग्य जपणे महत्त्वाचे आहे. ब्रेकिंग न्यूज मिळवण्याच्या नादात नाही ते धाडस ते करू नका. धाडस कोणत्या गोष्टीचे करावे, हे देखील समजून घेणे गरजेचे आहे. स्वतः ला जपा, कुटुंबाला जपा.कारण आपले कुटुंब आहे तरच आपण आहोत, असेही परदेशी यांनी सांगितले.

मिलिंद अष्टीवकर म्हणाले की,मराठी पत्रकार परिषद १०० वर्षाकडे वाटचाल करीत आहे. पत्रकारांसाठी ग्रामीण भागात कार्यक्रम घेतल्याने तेथील पत्रकारांना एक बळ मिळते.

राज्यभरातून आलेल्या पत्रकारांचे स्वागत याप्रसंगी स्वागताध्यक्ष विनोद बोराडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परभणी जिल्हा सरचिटणीस मोहम्मद इलियास यांनी तर सूत्रसंचालन सुभाष मोहकरे यांनी केले. आभार रेवणआप्पा साळेगावकर यांनी मानले.

## आ.सुरेश धस यांच्या

शिक्षणासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी घेतलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.राखुंडे सर यांनी केले प्रास्ताविक श्रीम. उजगिरे मॅडम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम, श्री खडके सर, श्री रोकडे सर , श्री राठोड सर तसेच शाळेतील इतर शिक्षक व कर्मचाऱ्यांनी घेतले.शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीमती.कवचट मॅडम यांनी मानले.

## जय हिंद कॅम्पस बीडच्या

आपल्या शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण घेण्याचे प्रतिपादन केले व चांगले गुण आत्मसात करण्यासंबंधी मार्गदर्शन केले. यावेळी सलीम जहांगीर यांनी जय हिंद कॅम्पसची होत असलेली उत्तरोत्तर प्रगती संदर्भात कौतुक केले व विद्यार्थ्यांना चांगल्या शिक्षणाची संधी कॅम्पसच्या निमित्ताने या भागांमध्ये उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेचे सचिव शेख निजाम यांचे अभिनंदन केले. आलेल्या सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीने बनवून आणलेल्या विविध स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद घेतला व त्यांचे तोंड भरून कौतुक केले. आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत व आभार जय हिंद कॅम्पसचे सचिव शेख निजाम यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी पालक उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जय हिंद एज्युकेशन कॅम्पसच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## समर्थांचे पादुकापूजन

श्रीराम मंदिरात पोहोंचली. फटाक्यांची आतषबाजी, बँड पथक,महिला भजनी मंडळे, भगबे ध्वज, व सजविलेल्या रथात विराजमान समर्थांच्या पादुका हे शोभायात्रेचे आकर्षण ठरले होते. छत्रपती शिवाजीमहाराज चौकात समर्थांच्या पादुकांचे स्वागत आ.नमिता मुंदडा,माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा,श्री योगेश्वरी देवल कमिटीचे सचिव प्रा. अशोक लोमटे,पं.उद्धवराव आपेगांवकर, रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे,ॲड. मकरंद पत्की, माजी उपनगराध्यक्ष बबन लोमटे,कृष्णा लोमटे , ॲड.संतोष पवार,

मठाधिपती श्री. गदाधरबुवा रामदासी व मान्यवरांनी पादुकांचे स्वागत केले.आ. नमिता मुंदडा यांच्या हस्ते महाआरती झाली. या शोभायात्रेत महिला व भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## *मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी*

कैलास लऊळकर, संघटक अश्विनी फुंदे, सहसंघटक पूजा सावंत यांच्या निवडी सर्वानुमते करण्यात आल्या यावेळी झालेल्या बैठकीत विविध विषयावर चर्चा करण्यात आली.

यावेळी मुकुंद हिवाळे , नितीन चांभारे, दीपक सोनवणे, गणेश गायकवाड, अनंत शेंडगे, भगवान चव्हाण, नवनाथ नेहरकर, झगडे गोविंद, देशमाने अशोक, आजारी अश्विनी, जोगडे पूजा, धायरे अनिता, उघडे सीमा, शिंदे विद्या, बापमारे अर्चना, वैष्णवी राऊत, अंकुश पटेकर, हिना सौदागर, अमोल शेरकर, राठोड विशाल, विलास आळसे, संजय रोकडे, शहा गोसमोद्दीन, हनुमान चाळक, राहुल निसर्गांध, सय्यद नईम, थेटे रंगनाथ विनोद पटाईत (परीवहन महामंडळ) इत्यादी सह असंख्य प्रशिक्षणार्थी ( ट्रेनर टीचर ) उपस्थित होते.या बैठकीला कॉंग्रेस नेते दत्ताभाऊ कांबळे , अमोल शेरकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले..



**माजलगाव: तालुक्यातील आश्रम शाळा तांडा वारोळा येथील ऊसतोड कामगारांच्या ट्रॅक्टरचा पाथर्डी कर्जत रस्त्यावर अपघात होऊन कामगार दाम्पत्य पप्पू राठोड व आरती राठोड यांचे जागीच दुर्दैवी निधन झाले त्यांच्या कुटुंबियांची दि ०१ फेब्रुवारी शनिवार रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गटाचे माजलगाव विधानसभेचे नेते मोहनराव जगताप यांनी भेट देऊन सांत्वन केले.तसेच त्यांच्या पश्चात तीन लहान मुले असून त्यांना स्व लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळांकडून मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले.तसेच त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी सर्वोत्तपरी मदत करणार आहे.**

# जि.प प्राथमिक शाळा शिंदेवाडी येथे बालगोपाळांचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील शिंदेवाडी येथील जि.प.प्रा शाळा स्थापन झाल्यापासुन पहिल्यांदाच चिमुकल्यांचा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात व यशस्वीपणे संपन्न झाला.



यावेळी मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण अधिकारी सुनील केंद्रे तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख अर्जुन बोराडे, मुख्याध्यापक शिवहार चोपणे, ग्रा.प.सदस्य दादा निकम, सहशिक्षक सचिन जावळे,पत्रकार सचिन उजगरे,सहशिक्षक जयराम मांगडे शाळा व्यवस्थापन समिति अध्यक्ष रमेश निकम,उपाध्यक्ष व सर्व सदस्य उपस्थित होते. अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांनी शाळेविषयीच्या प्रगतीबद्दल, विविध उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त केले.चिमुकल्यांचा स्नेहसंमेलनाचा पहिल्यांदाच होणारा कार्यक्रम पाहून सर्व पालक वर्गातून समाधान व्यक्त करण्यात आले कारण येथे जि.प.शाळा स्थापन झाल्यापासुन पहिल्यांदाच शाळेत स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम पार पडला याचे सर्व श्रेय मुख्यधापिका सरिता करंजकर यांना जाते.याकामी त्यांना ट्रेनी शिक्षक योगीराज शिंदे यांचे व पालकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री.बांगर सर, श्रीमती.शिंपले मॅडम, काळेबेरे मॅडम, अंगणवाडी ताई, शाळा व्यवस्थापन समिती तसेच सर्व ग्रामस्थांनी अनमोल असे सहकार्य केले.

## पाटोद्यात सराफा दुकान फोडण्याचा प्रयत्न

पाटोदा । प्रतिनिधी

शहरातील बस स्थानक रोडवरील आर्या ज्वेलर्स नामक दुकानात जबर चोरीचा तिघा चोरट्यांचा प्रयत्न शनिवारी फसला मेन रोडवरील पहिल्या मजल्यावर असलेला आर्य ज्वेलर्स येथे पहाटे.तीनच्या दरम्यान चोरटे स्वतःजवळ असलेले हत्याराच्या साह्याने शटरची कुलूप. तोडण्याचा.प्रयत्न करीत होते परंतु गस्तीवर असलेल्या पोलिसांच्या गाडीचा आवाज आलेले चोर पसार झाले हे दृश्य सीसीटीव्ही कॅमेरात कैद .झाले सीसीटीव्ही बसवा दिवसाढवळ्या चोरीचे प्रमाण पाहता .पोलीस नगरपंचायत व्यापाऱ्यांनीय एकत्र येत शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत असे सर्व व्यापारी म्हणाले.

# मराठी पत्रकार परिषदेच्या पुणे ते सेलु रॅलीचे पाटोदा नगरीत भव्य स्वागत

पाटोदा । प्रतिनिधी

सर्वसामान्याच्या प्रश्नांना पत्रकार वाचा फोडतो मात्र पत्रकारांच्या प्रश्नांचा काय त्यांचे प्रश्नांचा सगळ्यांच विसर पडतो त्यामुळे पत्रकारांच्या अधिवेशनात सरकारच्या माध्यमातून प्रश्नांची सोडवणूक होते.त्यामुळे सेलू येथे होत असलेल्या अधिवेशनात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे.सेलू येथील पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या निमित्ताने पुणे ते सेलू काढण्यात आलेली रॅली हे तालुका स्तरावरील पत्रकारांचे प्रश्न समजून घेण्यासाठीच आहे . त्यांचे प्रश्न समजून घेऊन त्याची सोडवणूक करणे हाच या रॅलीचा मुख्य उद्देश आहे . असे प्रतिपादन मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस . एम . देशमुख यांनी पाटोदा येथील स्वागत समारंभात बोलताना केले . यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे परिषदेचे राज्य उपाध्यक्ष गणेश मोकाशी पुणे जिल्हा अध्यक्ष सुनील लोणकर ,पिंपरी चिंचवड चे अध्यक्ष अनिल वडघुले,गणे



मोकाशे,भरत निगडे,तात्या शेलार,विनय सोनवणे,अविनाश आवक, यांच्यासह पुण्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघ व सेलू तालुका मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श जिल्हा व तालुका पुरस्कार वितरण सोहळा व पत्रकारांचे अधिवेशन दि. १ फेब्रुवारी रोजी परभणी जिल्ह्यातील सेलू येथे आयोजित केला असून या कार्यक्रमाचे औचित्य साधून मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पुणे ते सेलू रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

ही रॅली पाटोदा शहरातील शासकीय विश्रामगृह येथे येताच ढोल ताशाचा गजरात,फटाक्यांची आतिषबाजी, घोषणा देत जोरदार स्वागत मराठी पत्रकार परिषद शाखेच्या वतीने करण्यात आले.या स्वागताचे एस.एम.देशमुख यांनी कौतुक करत पाटोदा शाखेचे कार्याचे सुध्दा कौतुक केले.यावेळी पाटोदा नगरपंचायत उपनगराध्यक्ष रोहिदास गीते, मराठी पत्रकार परिषदेचे तालुका अध्यक्ष अजय जोशी,जेष्ठ पत्रकार कादर मकराणी, इद्रीस चाऊस,कॉ. महादेव नागरगोजे, भाई विष्णूपंत घोलप, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवभुषण जाधव, राष्ट्रीय कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव, शिवसेना उबाठा गटाचे तालुका अध्यक्ष मुकुंद शिंदे,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे नेते डॉ.नरेंद्र जावळे,प्रकाश जावळे ,समता परिषद तालुकाध्यक्ष दिगंबर नाईकनवरे,शेख फय्याज ,शेख मोहसिन,फय्याज सर, मराठी पत्रकार परिषद हल्ला कृती समितीचे अध्यक्ष संजय सानप, भाऊसाहेब पवार,बबन उंकाडे,सचिव हमीदखान पठाण, माजी अध्यक्ष मराठी पत्रकार परिषद सचिन पवार, उपाध्यक्ष अशोक भवर, अनिल गायकवाड, जावेद शेख, कोषाध्यक्ष दत्ता देशमाने, सतिश गर्जे,नानासाहेब डिडुळ, जितेंद्र भोसले,इम्रान शेख, सचिन शिंदे, सलीम शेख, हरिदास शेलार ,मराठी पत्रकार परिषदेचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रस्तावित व सुत्रसंचालन प्रा.सचिन पवार यांनी केले तर उपस्थितांचे आभार पाटोदा शाखेचे अध्यक्ष अजय जोशी यांनी मानले.

# लोककला संवर्धन या विषयावरील राष्ट्रीय परिषद संपन्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर,आणि अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचा नाट्यशास्त्र विभाग आयोजित एक दिवसीय लोककला संवर्धन या विषयावरील राष्ट्रीय परिषद संपन्न झाली त्यात उद्घाटक म्हणून पं.उद्धव आपेगावकर यांनी संगीताचे महत्त्व विशद केले.आपला सांकेतिक प्रवास त्यांनी लोककलावंत अभ्यासक संशोधक आणि प्राध्यापकांना सांगून एक प्रेरणादायी वातावरण निर्माण केले. याप्रसंगी बीजभाषक म्हणून पुणे येथील डॉ.संजय देशमुख तर लोकवाद्य प्रदर्शनाचे उद्घाटक बीडच्या केएसके महाविद्यालयाचे उपप्राचार्य,आणि नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.संजय पाटील देवळाणकर हे उपस्थित होते.उद्घाटन समारंभाच्या

अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर होते. लोककला या अभिजात कलां एवढ्याच श्रेष्ठ असून लोककलावंतांनी कोणत्याही प्रकारची कमीपणाची भावना बाळगू नये. स्वतःला अप्रतिष्ठित समजू नये.कारण लोककला याच मराठी रंगभूमीच्या पाया आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळापासून या कला मानवी जीवन सुसंस्कृत बनवण्याचे आणि संस्कृती संवर्धनाचे कार्य करत आहेत. असे मत आपल्या भाषणातून व्यक्त करत,राष्ट्रीय परिषदेचे आयोजन लोककलांनी सादर करण्याच्या उपक्रमाचे आयोजकाचे विशेष कौतुक डॉ.संजय देशमुख यांनी केले. लोकवाद्य ही शास्त्रीय वाद्यां एवढीच महत्त्वाची आहेत.



लोकवाद्यांमुळे प्रशिक्षकांना रोजगाराच्या ही संधी उपलब्ध होतात. असे मत डॉ.संजय पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी भरविण्यात आलेल्या लोककला वाद्यांमध्ये बीड येथील पवन शिंदे ,कोरडे, हेआणि हे वादक उपस्थित होते.आपल्या सादरीकरणाने त्यांनी उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली. लोककला परिषदेच्या निमित्ताने, ओवी ते लावणी तसेच उखाणे घेणे असा लोककलावंतांच्या सादरीकरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता.त्यात थोरले व धाकटे देवघर येथील चंद्रकांत गोस्वामी,वामन गोस्वामी,विश्वंभर, गोस्वामी,नंदकुमार तनगूल,राहूल देशपांडे,प्रा.प्रसाद हिवरेकर,सागर दिक्षित,उमा दीक्षित,उर्मिला गोस्वामी आदींनी लळिते सादर केली.राम मंदीर जगत जननी भजनी मंडळातील संगीता कुलकर्णी,ज्योती कन्सुरकर,जया मुडेगांवकर,प्रतिभा वडगावकर, अर्चना जोशी (उखाणे)यांसह पंधरा जणींचाभजनात सहभाग होता.श्री जाधव आणि संचाचे गोंधळ गीत, सचिन एडके यांचा पोवाडा, कु.सृष्टी आचार्य हिची लावणी आणि कु.प्रिया राठोड हिच्या बंजारा नृत्याचे सादरीकरण झाले.यावेळी संशोधक वाचकगोवा ,के एस.के.महाविद्यालय बीड,वर्धा येथील संशोधक,प्राध्यापक सहभागी झालेले होते. याचपरिषदेमध्ये ऑनलाईन पद्धतीने डॉ. सतीश पावडे (वर्धा) यांनी भरत नाट्य शास्त्रातील लोकधर्मी वृत्ती आणि लोककलांचा सहभाग यासहभरताचे नाट्यशास्त्रातील लोकाभिमुखता या विषयावर पावडे यांनी मार्गदर्शन केले. डॉ गणेश चंदनशिवे लोककला विद्यापीठ मुंबई ,यांनी संतांनी रचलेल्या गोंधळ या कलेचा इतिहास सांगून गोंधळ गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. मुंबईच्या लोककला विद्यापीठातील डॉ.मोनिका ठक्कर यांनी गुजराती लोककला प्रकारांचा सखोलआढावा उपस्थित प्रेक्षक श्रोत्यांसमोर मांडून गुजराती लोकगीतांचे गायन केले तसेच गुजराती लोककलेतील स्त्री भावना त्यांनी व्यक्त करून उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली. डॉ वैशाली गोस्वामी कुलकर्णी (नांदेड) यांनी दासोपंत कृत लोककला आणि दासोपंतांच्या साहित्यातील लोकधर्मी वृत्ती याविषयी सविस्तर माहिती देऊन समाजाभिमुख लोककला प्रकारांचा दासोपंतांनी मांडलेला आलेख संशोधकांसमोर मांडला.डॉ.साईश देशपांडे (गोवा)यांनी गोव्यातील लोककला प्रकारांची माहिती देऊन उपस्थित संशोधकांना भारावून सोडले.या परिषदेत डॉ.शैलजा बरुरे प्रा.रमेश सोनवळकर, प्रा.वहिदा पठाण प्रा.सैमुद्दीन यांच्यासह अनेक प्राध्यापकानीआपल्या संशोधन लेखातून विविध लोककला प्रकारांचा आढावा त्याचा इतिहास त्याचे उपयोजन विविध पैलूंनी उपस्थितांसमोर मांडले. परिषदेच्या आयोजक डॉ.संपदा कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात लोककला संवर्धन काळाची गरज आहे, केवळ संशोधनापेक्षा वेगवेगळ्या व्यासपीठांवरून लोककलावंतांच्या सादरीकरणाला संधी मिळण्याची गरज आहे. असे मत व्यक्त करून लोककला परिषदेचे आयोजन करण्याची संधी दिल्याबद्दल डॉ.बा.आं.म.विद्यापीठ आणि योगेश्वरी शिक्षण संस्थेचे आभार मानले. याप्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.आर.थारकर यांनी स्वागतपर भाषण केले.राष्ट्रीय परिषद एकूण चार सत्रात संपन्न झाली.प्रत्यक्ष लोककलांचे मंचावर सादरीकरण हे याचे वैशिष्ट्य होते. लोककलांच्या सादरीकरणाबद्दल आणि या अनोख्या आयोजनाबद्दल डॉ संपदा कुलकर्णी यांचे सर्वांनी अभिनंदन केले.कृष्णा मस्के, पियुष सावरे,नेहा बोंडगे उर्मिला मस्के,वैशाली मगर आणि भार्गव रामदासी या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या लोककला विषयक भित्तिपत्रकाचे प्रकाशन या प्रसंगी झाले. उपस्थितांचे आभार प्रा. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी मानले.या परिषदेचे संचालन प्रा.ममता राठी आणि प्रा.सागर कुलकर्णी यांनी केले. या परिषदेच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य प्रा.रमेश सोनटक्के अंतर्गत गुणवत्ता हमी मंडळाचे डॉ.गंगाधर अकलोड,उपप्राचार्य प्रा.जितेंद्र देशपांडे, , प्रा.श्रीकांत जवळगावकर डॉ राम बडे,डॉ.निलेश होदलुरकर यांनी तर तांत्रिक सहाय्य प्रा. बी.के.भाबरदोडे, प्रा. ज्ञानेश्वर वडजे डॉ. संकेत तोरंबेकर यांनी केले. परिषदेच्या यशस्वीतेसाठी डॉ. किरण चक्रे ,डॉ.भारती गडदे,प्रा.महेंद्र देशपांडे आणि सर्व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

cmyk

लोकतंत्र शेत-शिवार
सोमवार दि.३ फेब्रुवारी २०२५
४

# सात शेतीमालाच्या वायदेबंदीला दोन महिन्यांची मुदतवाढ

## शेतकरी, व्यापाऱ्यांची निराशा

मुंबई : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन अर्थसंकल्पात सात शेतीमालाच्या वायद्यांवरील बंदी उठवेल, अशी अपेक्षा होती. मात्र सेबीने वायदेबंदीला पुन्हा मुदतवाढ देत ३१ मार्च २०२५ पर्यंत केली. वायदेबंदीमुळे महागाई वाढत नाही शिवाय वायद्यांमुळे किंमत जोखिम व्यवस्थापन शक्य होते आणि भविष्यातील किमतीचा अंदाज बांधता येतो, असे अनेक अभ्यासातून सिध्द झाले. तरीही सरकारने वायदेबंदीला दोन महिन्यांची मुदतवाढ दिली.

सात शेतीमालाच्या वायद्यांवर डिसेंबर २०२१ मध्ये वायदेबंदी केली होती. यात सोयाबीनसह सोयातेल आणि सोयापेंड, मोहरीसह मोहरीतेल आणि मोहरीपेंड, कच्चे पाम तेल, हरभरा, गहू, बिगर बासमती तांदूळ तसेच मुगाचा समावेश आहे. नुकतेच सरकारने वायदेबंदीला ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली होती. वायदेबंदीची मुदत ३१ जानेवारी आणि केंद्राचा अर्थसंकल्प १ फेब्रुवारीला होता. त्यामुळे अर्थमंत्री निर्मला सितारामन अर्थसंकल्पात वायदेबंदी उठवल्याची घोषण



करतील अशी अपेक्षा व्यक्त केली होती. विशेष म्हणजे सरकारने जे कारण देत वायदेबंदी केली होती, ती परिस्थिती बाजारात नाही. वायद्यांमुळे शेतीमालाच्या भावात अवास्तव भाववाढ होते, असे कारण देत वायदेबंदी केली होती. पण मागील तीन वर्षात वायदेबंदी असतानाही अनेक शेतीमालाचे भाव मोठ्या प्रमाणात वाढलेही आणि पडलेही. सध्या सोयाबीन, हरभरा, मूग, मोहरी या शेतीमालांचे भाव कमी झाले आहेत. त्यामुळे सरकार वायद्यांवरील बंदी उठवेल, अशी अपेक्षा होती. अर्थमंत्री अर्थसंकल्पात याविषयीची घोषणा करतील, अशी शक्यता होती. कारण आर्थिक पाहणी अहवालातही शेतीमाल बाजारातील जोखीम कमी करण्यासाठी वायदेबाजारासारख्या साधनांचे अप्रत्यक्ष समर्थन करण्यात आले होते. मात्र सरकारने पुन्हा एकदा शेतकरी आणि व्यापाऱ्यांची निराशा केली.

### बाजार सुधारणांच्या नुसत्याच गप्पा

सोयाबीनसह बहुतांशी शेतीमालाचे भाव पडले आहेत. त्यामुळे वायदे सुरु करण्याची गरज आहे. सरकार एकीकडे मात्र बाजार सुधारणांच्या गप्पा करते आणि दुसरीकडे वायदे बाजार चालू देत नाही, अशी टिका शेतकरी करत आहेत.

# असे काढले जाते फार्मर आयडी

मुंबई : केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध शेतीविषयक योजानंचा लाभ घ्यायचा असल्यास शेतकऱ्यांकडे शेतकरी ओळखपत्र असणं आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी विकास मंत्रालयाकडून ॲग्रीस्टॅक या डिजीटल उक्रमाद्वारे शेतकऱ्यांना ओळखपत्र देण्यासंदर्भात निर्णय घेतला गेला आहे. महाराष्ट्रात देखील शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक अंतर्गत डिजीटल शेतकरी ओळखपत्रासाठी नोंदणी करावी लागणार आहे. फार्मर आयडीसाठी नोंदणी कुठं करायची? कोणती कागदपत्रं असणं आवश्यक आहेत शेतकऱ्यांना माहिती असणं आवश्यक आहे.

फार्मर आयडी काढण्यासाठी लागणारी कागदपत्रं : केंद्र व राज्य सरकारकडून शेती विषयक योजना चालवल्या जातात. त्या योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र आवश्यक आहे. हे ओळखपत्र काढण्यासाठी आधार कार्ड, सात बारा उतारा गट क्रमांक, नमुना ८ अ खाते उतारा क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि लाभार्थी शेतकरी नोंदणीवेळी उपस्थित असणं आवश्यक आहे. फार्मर आयडी नोंदणीसंदर्भात तलाठी कार्यालय, कृषी सहाय्यक आणि सीएससी केंद्र चालकांशी संपर्क करु शकता.

कोणत्या योजनांच्या लाभासाठी फार्मर आयडी आवश्यक?

पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजना, पीक विमा योजना, कृषी विभाग यांत्रिकीकरण योजना, थेट लाभा हस्तांतरण योजना, पीक कर्ज सुलभपणे मिळवण्यासाठीच्या या ओळखपत्राचा उपयोग होणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी शेतकरी ओळखपत्र काढणे आवश्यक आहे. जर शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढलं नाही तर त्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळं नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढणं आवश्यक आहे.



ॲग्रीस्टॅक प्रकल्प नेमका काय?

ॲग्रीस्टॅक हे असं डिजीटल फाऊंडेशन असेल ज्याद्वारे डेटा आणि डिजीटल सेवा वापरुन शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी स्थापन केलं जाणार आहे. यामध्ये शेतकऱ्यांना डिजीटल ओळखपत्र दिलं जाईल. त्यामध्ये त्यांच्या शेतीसंदर्भातील माहितीचा समावेश असेल. ॲग्रीस्टॅक हा प्रकल्प बीड जिल्ह्यात राबवण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्यानं नोंदणीचे तीन संच असतील. यामध्ये शेतकऱ्यांचा आणि त्याच्या शेतांचा आधार संलग्न नोंदणी संच, भूसंदर्भिकृत व्याप्त दर्शवणारा गाव नकाशांचा नोंदणी संच, हंगामी पिकांचा नोंदणी संच असेल.

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेसाठी देखील फार्मर आयडी आवश्यक

शेतकऱ्यांना जर पीएम किसान सन्मान निधीच्या १९ व्या हप्त्याची रक्कम मिळवायची असल्यास फार्मर आयडी मिळवावा लागेल. पीएम किसान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना एका वर्षामध्ये ६००० रुपयांची रक्कम तीन समान हप्त्यांमध्ये दिली जाते. त्यामुळं आगामी १९ व्या हप्त्याची रक्कम मिळवायची असल्यास शेतकऱ्यांना फार्मर आयडी मिळवणं आवश्यक आहे.

# पीएम धन धान्य कृषी योजना कसा होणार फायदा?

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मोदी सरकारचा अर्थसंकल्प सादर केला असून यंदाच्या अर्थसंकल्पात त्यांनी अनेक महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सविधा यांच्या विकासासाठी सरकारने भरीव तरतूद केली आहे. मात्र, यावेळी केंद्राने शेती क्षेत्राच्या विकासाकडे विशेष लक्ष दिल्याचे दिसते आहे.

अर्थमंत्र्यांनी देशातील १.७ कोटी शेतकऱ्यांना आनंदाची बातमी दिली आहे. सीतारामन यांनी या अर्थसंकल्पात पीएम कृषी धन धान्य योजनेची घोषणा केली आहे. या योजनेत १०० जिल्ह्यांचा सहभाग असणार आहे. याच पार्श्वभूमीवर ही योजना नेमकी काय आहे? या योजनेमुळे शेतकऱ्यांना नेमका काय फायदा होणार? हे जाणून घेऊ या.

नेमकी काय आहे पीएम धन कृषी योजना?

पीएम धन कृषी योजनेअंतर्गत देशाभरातील १०० जिल्ह्यांची निवड केली जाणार आहे. ज्या



जिल्ह्यांमध्ये उत्पादकता कमी आहे, त्यांचा या १०० जिल्ह्यांमध्ये समावेश केला जाणार आहे. शेतीच्या विकासासाठी सध्या चालू असलेल्या काही योजनांना एकत्र करून शेतीचा विकास करण्यावर भर दिला जाईल. राज्य सरकारच्या सहकार्याने ही योजना राबवली जाणार आहे. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार देशभरातल्या एकूण १.७ कोटी शेतकऱ्यांना या योजनेचा थेट लाभ होणार आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी वेगवेगळी अवजारं, बी-बियाणे, खत खरेदीसाठी आर्थिक मदत केली जाणार असून सोबतच या योजनेच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात रोजगार कसा वाढेल? यावरही काम केले जाणार आहे.

असा मिळणार शेतकऱ्यांना लाभ?: शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहित केले जाईल. पिकाची साठवणूक तसेच सिंचन व्यवस्थेत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला जाईल. सोबतच उच्च गुणवत्ता असलेले बी-बियाणे तसेच कृषी उत्पादन वाढवण्यासाठी खतांचा पुरवठा शेतकऱ्यांना केला जाईल. तसेच या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, कृषी पंप आदी उपकरणे घेण्यासाठीही अर्थसहाय्य केले जाणार आहे.

# उन्हाळी हंगामासाठी सूर्यफुल लागवड तंत्रज्ञान

शेतकऱ्यांकडून लागवड केल्या जाणाऱ्या बहुतांशी पिकांची ठराविक हंगामातच उदा. ज्वारी-खरीप व रब्बी, तुर खरीप, भुईमूग-खरीप व उन्हाळी, गहु, हरभरा, करडई-फक्त रब्बी इत्यादी तसेच यांच्या पेरणीचा कालावधीही ठरलेला आहे. पीक वाढीच्या दरम्यान देखील या पिकांच्या हवामानाच्या गरजा ठरलेल्या आहेत. यात बदल झाल्यास पीक वाढीवर अनिष्ट परिणाम होतो. सुर्यप्रकाशाच्या तीव्रतेचा परिणाम न होणारे हे पीक कोणत्याही हंगामात तसेच कोणत्याही कालावधीत लागवडीखाली घेतले जाते. याचा पिकाच्या उत्पादनावर कोणताही अनिष्ठ परिणाम होत नाही.

जमीन : सूर्यफुल लागवडीसाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी मध्यम ते भारी जमीन निवडावी. आम्लयुक्त व पाणथळ जमिनीत हे पिक चांगले येत नाही.

पूर्वमशागत : जमिनीची खोल नांगरट करुन त्यानंतर कुळवाच्या उभ्या आडव्या दोन ते तीन पाळ्या घ्याव्यात. शेवटच्या कुळवाच्या पाळीपूर्वी हेक्टरी २० ते २५ गाड्या चांगले कुजलेले शेणखत घालावे.

पेरणीची वेळ/पेरणीचे अंतर/पेरणी पध्दत : उन्हाळी हंगामातील लागवडीकरिता फेब्रुवारीचा पहिला पंधरवडा हि पेरणीची उत्तम वेळ आहे. बागायती पिकाची लागवड सरी वरंबा वरंब्यावर टोकण पध्दतीने करावी.

मध्यम ते खोल जमीन - ४५ ३० सें.मी. भारी जमीन - ६० ३० सें.मी. संकरीत वाण - ६० ३० सें.मी.

बियाणे : सुर्यफुलाचे पेरणीसाठी सुधारीत वाणाचे ८-१० किलो तर संकरीत वाणाचे ५-६ किलो बियाणे प्रती हेक्टरी वापरावे.

बीजप्रक्रिया : मर रोगाच्या प्रतिबंधासाठी २ ते २.५ ग्रॅम थायरम किंवा ग्रासिकॉल प्रति किलो बियाण्यास चोळावे., केवडा रोग टाळण्यासाठी ६



ग्रॅम ॲप्रॉन ३५ प्रती किलो बियाण्यास चोळावे., तसेच विषाणुजन्य (नेक्रॉसीस) रोगाच्या प्रतिबंधासाठी इमिडॅक्लोप्रिड ७० डब्ल्यू.ए. गाऊचा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास लावावे., त्यानंतर अँझोटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळविणारे जिवाणु खत २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास पेरणीपूर्वी लावावे.

रासायनिक खते : बागायती पिकास प्रति हेक्टरी ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद व ३० किलो पालाश द्यावे व उरलेल्या ३० किलो नत्राची मात्रा पेरणीनंतर एक महिन्याच्या आत द्यावी. गंधकाची कमतरता असलेल्या जमिनीसाठी प्रति हेक्टरी २० किलो गंधक पेरणीच्या वेळी गांडुळ खतातून द्यावे.

आंतरमशागत : पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी दोन रोपातील अंतर ३० सें.मी. ठेवून विरळणी करावी. पेरणीनंतर १५ दिवसांनी एक खुरपणी करावी. तसेच दोन कोळपण्या कराव्यात. पहिली कोळपणी पेरणीनंतर २० दिवसांनी व दुसरी कोळपणी ३५ ते ४० दिवसांनी करावी.

पाणी व्यवस्थापन : सुर्यफूलाच्या पिकास संवेदनक्षम अवस्थेत पाणी देणे अत्यंत गरजेचे आहे. सुर्यफुलाच्या संवेदनक्षम अवस्था जसे की १. रोप अवस्था २. फुलकळी अवस्था ३. फुलो-याची अवस्था ४. दाणे भरण्याची अवस्था या संवेदनशील अवस्थेत पाण्याचा ताण पडू देऊ नये. फुलकळी अवस्था ते दाणे भरण्याच्या अवस्थेत पाण्याचा ताण पडल्यास दाणे पोकळ राहतात व उत्पादनात घट येते.

पीक संरक्षण : विषाणुजन्य रोग हा रस शोषणा-या फुलकिड्यांमार्फत होतो. त्यांच्या नियंत्रणासाठी इमिडोक्लोप्रीड २०० एस. एल. २ मि.ली. प्रती १० लीटर पाणी या प्रमाणात पेरणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने तीन वेळा फवारण्या कराव्यात. मावा व तुडतुडे यांच्या नियंत्रणासाठी डायमिथेएट ३० प्रवाही ०.०३ टक्के फवारावे. घाटे अळीच्या नियंत्रणासाठी एन्डोसल्फान ३५ प्रवाही ७०० मिली किंवा क्विनॉलफॉस २५ प्रवाही १००० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टरी वापरावे. केसाळ अळीच्या नियंत्रणासाठी अळ्यांचे पुंजके येथून रॉकेल मिश्रीत पाण्यात टाकुन त्यांचा नाश करावा किंवा क्विनॉलफॉस १.५ टक्के किंवा कार्बारिल १० टक्के भुकटी २५ किलो प्रति हेक्टरी बारा शांत असताना धुरळावी. जैविक किड नियंत्रण सुर्यफुलावरील पाने खाणारी अळी, केसाळ अळी, घाटे अळी यांच्या नियंत्रणासाठी एच.एन.पी.व्ही. या विषाणुंची फवारणी करावी.

काढणी:सुर्यफुलाची पाने,देठ व फुलाची मागील बाजु पिवळी झाल्यानंतर पिकाची कापणी करावी. कणसे चांगली वाळवून नंतर मळणी करावी.

उत्पादन : संकरीत वाणापासून १२ ते १५ क्विंटल आणि बागायती संकरीत वाणापासून प्रतिहेक्टरी १५ ते २० क्विंटल उत्पादन मिळते.

विशेष बाबी : पीक फुलो-यात असतांना सकाळी ७ ते ११ या वेळेत हाताला तलम कापड गुंडाळून फुलाच्या तबकावरुन हळुवार हात फिरवावा म्हणजे कृत्रिम परागीभवन होऊन दाणे भरण्याचे प्रमाण वाढते. सुर्यफुलाच्या फुल उमलण्याच्या अवस्थेत व त्यानंतर आठ दिवसांनी २ ग्रॅम बोरॅक्स प्रती लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. त्यामुळे दाणे भरण्याचे प्रमाण व दाण्याचे वजन वाढते. परागीभवन होण्यासाठी प्रति हेक्टरी ४-५ मधमाश्यांच्या पेट्या ठेवाव्यात.

सूर्यफूल पिकाची फेरपालट करावी. सुर्यफूलाची मुळे जमिनीत खोलवर जातात. दरवर्षी त्याच जमिनीत वारंवार हे पीक घेतल्यास जमिनीचा पोत बिघडून उत्पादन क्षमता कमी होते. तसेच रोग व किडीचा प्रादुर्भाव वाढतो. त्यासाठी कमीत कमी ३ वर्षे तरी त्याच जमिनीत सुर्यफुलाचे पीक घेवू नये. पीक फुलोऱ्यात असतांना किटकनाशकाची फवारणी करु नये. अगदीच आवश्यक असेल तर एन्डोसल्फान ३५ प्रवाही या किटकनाशकाची संध्याकाळच्या वेळेस फवारणी करावी.



## दिन विशेष

### जागतिक दिवस

भारतीय तटरक्षक दल दिवस

### महत्वाच्या घटना

१७८३ : स्पेनने अमेरिकेच्या स्वातंत्र्यास मान्यता दिली.
१८१५ : स्विझर्लंड येथे पहिली पनीर बनविण्याचा कारखाना बनविण्यात आला.
१८७० : अमेरिकेच्या संविधानातील १५ वा बदल अमलात आला त्यामुळे मतदानातील वंशभेद संपुष्टात आले.
१९२५ : भारतात पहिल्यांदाच विजेवर चालणारी रेल्वे व्हिक्टोरिया टर्मिनस ते कुर्ला या स्थानकांदरम्यान सुरू झाली.
१९२८ : 'सायमन गो बॅक' या घोषणांनी सायमन कमिशनचा मुंबईत निषेध करण्यात आला.
१९३४ : आजच्या दिवशी विमानाने पार्सल पाठविण्याची सेवा सुरु झाली.
१९६६ : सोव्हिएत रशियाने लूना-९ हे मानवविरहित अंतराळयान चंद्रावर उतरवले.
१९७२ : जापान च्या साप्पारो नावाच्या शहरात पहिल्यांदा आशियात हिवाळी ऑलंपिक चे आयोजन केल्या गेले.
१९९९ : भारतीय राज्य जम्मू काश्मीर मध्ये डेमोक्रेटिक जनता दल या पार्टीची पुन:स्थापना करण्यात आली.
२००६ : आजच्या दिवशी इजिप्त चे जहाज एम.एस अल-सलाम बोकॅसिओ-९८ हे जहाज समुद्रात बुडाले.
२००९ : आजच्या दिवशी शिल्पा शेट्टी यांनी राजस्थान रॉयल्स मध्ये स्वत:ची हिस्सेदारी खरेदी केली.
२०१८ : आजच्या दिवशी भारताच्या अंडर-१९ क्रिकेट टीमने चौथ्यांदा वर्ल्ड कप आपल्या नावावर केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२१ : डॉ. एलिझाबेथ ब्लॅकवेल - वैद्यकशास्त्रातील पहिली महिला पदवीधर (मृत्यू: ३१ मे १९१०)
१८३० : युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान रॉबर्ट आर्थर टॅलबोट यांचा जन्म. (मृत्यू: २२ ऑगस्ट १९०३)
१८८७ : स्पेनचे पंतप्रधान हुआन नेग्रिन यांचा जन्म.
१९०० : तिरुवेंकट राजेंद्र शेषाद्री - रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: १९७५)
१९०९ : भारतीय स्वातंत्र्य सैनिक सुहासिनी गांगुली यांचा जन्म.
१९३८ : भारतीय चित्रपट अभिनेत्री वहीदा रहमान यांचा जन्म.
१९६३ : रघुराम राजन - भारतीय अर्थतज्ज्ञ
१९८३ : चित्रपट अभिनेता सिलांबरासन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४६८ : जर्मन प्रकाशक, स्वयंचलित मुद्रणाचा संशोधक योहान्स गटेनबर्ग यांचे निधन.
१८३२ : पहिले क्रांतिकारक व स्वातंत्र्यसैनिक उमाजी नाईक यांना ब्रिटिश सरकारने फाशी दिली. (जन्म: ७ सप्टेंबर १७९१)
१९२४ : वूड्रो विल्सन - अमेरिकेचे २८ वे राष्ट्राध्यक्ष आणि नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: २८ डिसेंबर १८५६)
१९५१ : वेगळ्या पाकिस्तानची मागणी करणाऱ्यांपैकी एक चौधरी रहमत अली यांचे निधन.
१९६९ : सी. एन. अण्णादुराई - तामिळनाडूचे मुख्यमंत्री (जन्म: १५ सप्टेंबर १९०९)
२००० : ला प्रसिद्ध तबलावादक उस्ताद कुरैशी अल्ला रक्खा खान यांचे निधन.
२०१२ : ला बॉलीवूड चित्रपट दिग्दर्शक राज कवर यांचे निधन.
२०१६ : ला मध्य प्रदेश चे माजी गव्हर्नर बलराम जाखड यांचे निधन.

# बिहारच्या शेतकऱ्यांना नव्या प्रजातीच्या ऊस बियाण्यांचे किट वाटप



कर्नाल : कर्नाल येथील प्रादेशिक संशोधन केंद्रातील ऊस पैदास संस्थेत आयोजित चार दिवसांच्या प्रशिक्षण शिबिराच्या शेवटच्या दिवशी, बिहारमधील शेतकऱ्यांना नवीन प्रकारच्या उसाच्या बियाण्यांचे किट देण्यात आले. यावेळी ऊस शेती मार्गदर्शक पुस्तिका प्रकाशित करण्यात आली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आलेले महाराणा प्रताप फलोत्पादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश कुमार मल्होत्रा म्हणाले की, कर्नालमधील ऊस केंद्रातून बिहारमध्ये लागवड केलेल्या उसाचे प्रमाण ७० टक्क्यांहून अधिक आहे, ही अभिमानाची बाब आहे. कुलगुरू डॉ. मल्होत्रा म्हणाले की, बिहार राज्याचे ऊस उत्पादन क्षेत्रात महत्त्वाचे योगदान आहे.

शेतकरी कमी साधनांमध्ये जास्त उत्पादन घेण्याचा प्रयत्न करत आहेत. नवीन वाणांबद्दल माहिती देताना, प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र कुमार यांनी शेतकऱ्यांना को-१७०१८ आणि को-१६०३० जातींचे बियाणे किट वाटप केले. याप्रसंगी कर्नाल संशोधन केंद्राचे अध्यक्ष डॉ. एम. एल. छाबरा, अभ्यासक्रम संचालिका डॉ. पूजा, वरिष्ठ तांत्रिक अधिकारी प्रमोद कुमार उपस्थित होते.

# तुमचा अपेक्षाभंग होणार नाही यासाठी प्रयत्नशील

## शिवसेनेतर्फे जाहीर सत्कार सोहळ्यात ना.पंकजाताई मुंडें यांची ग्वाही

जालना। प्रतिनिधी

काम निश्चलपणे करण्याचा संस्कार स्व. गोपीनाथराव मुंढे यांनी आपल्याला दिला आहे. सिंहासनावर , खुर्चीवर बसून प्रेम मिळत नसतं ते निर्माण करावं लागतं. लोक हाच माझा शृंगार , अलंकार आहेत. देवाने कपाळावर जेवढी लिहिली तेवढी जनतेची सेवा आपण करणार आहोत तथापि लहान असो की मोठा मी तुम्हा सर्वांची आई आहे. असे सांगतांनाच डि. पी. डि. सी. च्या ताटात जेव्हढे आहे त्यातील प्रत्येकाला कोर-कोर भर वाढू, तुम्ही दाखवलेला विश्वास पूर्ण करणार असून तुमचा अपेक्षा भंग होणार नाही यासाठी आपण प्रयत्नशील असल्याची ग्वाही महाराष्ट्राच्या पर्यावरण, हवामान बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री ना. पंकजाताई मुंढे यांनी शिवसेनेतर्फे आयोजित सत्कार सोहळ्यात दिली.

जालना दौऱ्यावर आल्या असता शनिवारी ( ता. ०१) शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या नाथपर्व निवासस्थानी जालना जिल्हा शिवसेनेच्या वतीने ना. पंकजाताई मुंढे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना



उपनेते माजी मंत्री आ.अर्जुनराव खोतकर हे होते .आ. हिकमत उढाण, आ. मनोज कायदे,जेष्ठ नेते राजेंद्र राख, जिल्हा संपर्क प्रमुख पंडितराव भुतेकर, फेरोजलाला तांबोळी,बाबासाहेब इंगळे, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, ,शहरप्रमुख विष्णू पाचफुले,भाऊसाहेब पाऊलबुध्दे, कैलास चव्हाण, डॉ.राजू डोईफोडे,डॉ.रामेश्वर वरखड,डॉ. प्रमोद डोईफोडे,उपजिल्हा प्रमुख संतोष मोहिते, गणेश सुपारकर, भूषण शर्मा,राजेंद्र लाड, रावसाहेब पवार, महिला आघाडी जिल्हाप्रमुख कालिंदाताई ढगे, शेख जावेद,दिनेश भगत, युवा सेना जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर , अजय कदम, गणेश मोहिते, योगेश रत्नपारखे,अंकुश पाचफुले,सुभाष बोडखे, अ‍ॅड. वाल्मीक घुगे,सुहास मुंढे, दीपक वैद्य, विक्रम कुसूंदल, गणेश घुगे, अशोक घुगे,रमेश घुगे,नारायण घुगे,कैलास पालवे,किशोर नागरे,गजेंद्र ढाकणे,यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

ना .पंकजाताई मुंढे यांनी सत्कार सोहळ्यास जमलेल्या जनसमुदायाकडे पाहत तुमच्या प्रत्येकाच्या डोळ्यात स्व.गोपीनाथराव मुंढे यांची छवी दिसतेय अशा भावना व्यक्त केल्या. राजकारण म्हणजे गढूळ पाण्यात धुणे धुण्यासारखे आहे .मी तुरटी फिरवतेय, मात्र ज्यांना स्वतःच्या वडिलांवर प्रेम करता आलं नाही , ज्यांनी स्वतःचे वडील गमावले तेच आज खोटे आरोप करतायेत .अशी सूचक टिप्पणी ना .पंकजाताई मुंढे यांनी केली. शिस्तीवरच भिस्त असते तरुणांनो व्यसनी होऊ नका, जीवन एन्जॉय करा ,वाईट विचार न करता चांगले आयुष्य घडवा ,असा सल्ला ना. पंकजाताई मुंढे यांनी दिला.

सुत्रसंचालन देवेंद्र बारगाजे यांनी केले तर जगत घुगे यांनी आभार मानले. कार्यक्रमास ओमप्रकाश चितळकर, अशोक बोडखे, अण्णासाहेब चित्तेकर , मिर्झा अन्वर बेग, रमेश मुळे, अ‍ॅड. संजय काळबांडे, डॉ.गजेंद्र मुंढे,अमोल कारंजेकर,महेंद्र अकोले, संतोष जेधे पाटील,ब्रम्हा वाघ,जफर खान, शेख नजीर, कैलास दुधानी,नानासाहेब वानखेडे,अमोल सुरूंग, उध्दव मरकड,अनिल सानप,बाबासाहेब चिखले,शिवाजी तरवटे,सर्जेराव वाघ, महादू गिते,हरीभाऊ कापसे,रावसाहेब वाघ, राजू वाघ,पद्माकर ढाकणे,बळीराम वाघ, भगवान मदन, नारायण सांगोडे,भगवान ढाकणे, कैलास ढाकणे, अनिल हिवराळे, तुकाराम खर्जुले ,भास्कर कायंदे ,बाबासाहेब कायंदे, देवा ढाकणे, दत्ता घडलिंग, यांच्यासह जिल्हाभरातील शिवसेना आणि महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, ना.मुंढे समर्थकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### कॅबिनेट बैठकीत महामंडळाचा अध्यादेश काढावा : आ. खोतकर

राष्ट्रसंत भगवान बाबा आर्थिक विकास महामंडळ स्थापनेबाबत निवडणुकीपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांनी घोषणा केली होती. आचारसंहितेमुळे याबाबतचा जी.आर.काढता आला नाही. तथापि येणाऱ्या कॅबिनेट च्या बैठकीत ना. पंकजाताई मुंढे यांनी अध्यादेशाबाबत लक्ष वेधून घेतील असा विश्वास शिवसेना उपनेते, आ. अर्जुनराव खोतकर यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केला. स्व. गोपीनाथराव मुंढे यांनी राज्यात माणसांची फौज मिळवली त्यांच्यासोबत चे प्रसंग, आठवणींना उजाळा देत स्व. मुंढे यांचा आम्हाला सदैव आधार होता. ही जाहीर भूमिका आपण पक्ष नेतृत्वासमोर मांडली. असे सांगून प्रत्येक प्रसंगात आम्ही ना. पंकजाताई मुंढे यांच्या सोबत राहत आलो आहोत आणि राहणार अशी जाहीर हमी आ. अर्जुनराव खोतकर यांनी दिली.

### सर्वसामान्यांना न्याय देतील : घुगे

स्व .गोपीनाथराव मुंढे यांच्या सारखेच त्यांचाच वारसा जपत असलेल्या ना. पंकजाताई मुंढे यांचे जालना जिल्ह्यात चाहते मोठ्या प्रमाणात असून त्यांच्या रुपाने जालना जिल्ह्यास खंबीर नेतृत्व मिळाले आहे. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आ. अर्जुनराव खोतकर यांचा आम्हाला सदैव पाठिंबा असतो. असे सांगून जिल्ह्यातील जनतेच्या आशा पल्लवीत झाल्या असून सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम ना. पंकजाताई मुंढे ह्या करतील. असा दुर्दम्य विश्वास शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी प्रास्ताविकात व्यक्त केला.

## थोडक्यात



### खुल्या राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेत अनामिका अहिरे प्रथम

आष्टी। प्रतिनिधी

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आष्टी - पाटोदा - शिरूरचे माजी आमदार भीमराव धोंडे साहेब यांच्या मातापित्यांच्या स्मृती प्रित्यर्थ गंगाई - बाबाजी महोत्सवानिमित्त आयोजित खुल्या राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेत अनामिका अहिरे (बीड) हिने प्रथम क्रमांक (११ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र) तर स्नेहा दुधाळ हिने द्वितीय क्रमांक (९ हजार एक रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र) तर तृतीय क्रमांक उमेश कुलथे व विजय शिंदे यांना (रोख रक्कम ७ हजार एक रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र) विभागून देण्यात आला.बक्षीस विजेत्या स्पर्धकांना शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव डॉ. अजय दादा धोंडे, परीक्षक प्रोफेसर डॉ. सुधाकर शेलार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, सभापती पांडुरंग नागरगोजे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. लावणी नृत्य स्पर्धेसाठी अहिल्यानगर, बारामती, इंदापूर, बीड अशा अनेक ठिकाणाहून मोठ्या संख्येने लावणी नृत्य स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रोफेसर डॉ. सुधाकर शेलार, प्रोफेसर एन.डी. चौधरी व रुपेश निकाळजे यांनी काम पाहिले.प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, परीक्षक प्रोफेसर डॉ. सुधाकर शेलार, प्रोफेसर एन. डी. चौधरी, उप प्राचार्य प्रा. डॉ. आप्पासाहेब टाळके यांच्या हस्ते यांच्या हस्ते नारळ वाढवून उद्घाटन करण्यात आले. डॉ. ज्ञानदेव वैद्य व प्रा. श्रीकांत धोंडे यांनी या लावणी नृत्य स्पर्धेचे बहारदार सूत्रसंचालन केले. प्रा. किशोर धोंडे यांनी आभार मानले.

### पालकमंत्र्याच्या पत्रकार परिषदेवर व्हाईस ऑफ मीडियाचा बहिष्कार

जालना। प्रतिनिधी

आज दि.१ शनिवार रोजी जालन्यात जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीमध्ये जिल्हा नियोजन समितीची बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकी दरम्यान पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी स्वतः पत्रकारांना नियोजन



बैठकीतून बाहेर जाण्यास सांगितले. वास्तविक पाहता २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त पंकजा मुंडे या जालन्यात असताना त्याच वेळी पत्रकारांनी नियोजन बैठकी मध्ये पत्रकारांना प्रवेश देण्याची मागणी केली होती. परंतु आज पालकमंत्र्यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक सुरु होण्यापुर्वी स्वतः पत्रकारांना बाहेर जाण्यास सांगितल्याने जिल्हा नियोजन बैठकीमध्ये वार्तांकन करण्यासाठी पत्रकारांना वंचित ठेवण्यात आले. त्यामुळे व्हाईस ऑफ मीडियाच्या वतीने पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा निषेध करून त्यांना बीडला पाठवा, तसेच स्थानिक आमदारांना जालन्याचे पालकमंत्री करा अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी पत्रकारांनी पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या पत्रकार परिषदेवर बहिष्कार घालून त्यांच्या बातम्यांवर वार्तांकन न करण्याचे जाहीर केले.

### संत खंडोजी बाबा विद्यालयाचे चित्रकला परीक्षेत यश

बीड : सन २०२४ मध्ये महाराष्ट्र शासन कला संचालनालय मार्फत घेण्यात आलेल्या इंटर नेट इंजिनियर रेखा कला परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून शाळेतील २८ पैकी २८ सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून १००% निकाल लागला आहे या परीक्षेत मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याचे संस्था अध्यक्ष महोदय राऊत शाळा मुख्याध्यापक श्री मंत्री भालेकर मॅडम यांनी अभिनंदन केले या परीक्षेसाठी श्री किशोर राऊत यांनी जास्त परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांचे चित्रकला विषयी आवड निर्माण केली परिसरातील पालक वर्ग यांनी किशोर राऊत सर यांचे अभिनंदन केले सखी सावित्री च्या अध्यक्षा रूपाली दडपे यांनी अभिनंदन केले



## कत्तलीसाठी जाणारे १५ गोवंशांची पोलिसांनी केली सुटका




जालना । प्रतिनिधी

३१ जानेवारी रोजी रात्री परतूर पोलिसांना मिळलेल्या गुप्त माहितीवरून गोवंशीय जनावरांना कत्तलसाठी सिल्लोड येथून परभणी येथे घेऊन जात असताना वाटुर फाटा परतूर येथे नाकाबंदी करून एक आयषर अडवून त्यांची झडती घेतली असता त्यामध्ये एकूण -१५ गोवंशीय बैल जनावरे मिळून आले आहेत.

त्यांची विचारपूस केली असता परभणी येथे कत्तल खाण्यात घेऊन जात असल्याचे समजले, एकूण १५ जनावरे किंमत ५ लाख ८६ हजार रुपये आणि आयशर टेम्पो किंमत १२ लाख रुपये, असा एकूण १७ लाख ८६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, सर्व जनावरे जप्त करून पारडगाव येथील गोशाळेत जमा केले आहे. यामध्ये आरोपी शेख इरफान शेख लूकमान कुरेशी रा. सिल्लोड, शेख रिजवान शेख मस्तान कुरेशी रा. सिल्लोड,शेख अन्सार शेख मोहम्मद हनीब कुरेशी रा. सिल्लोड, सद्दामखान मुस्ताक खान राहणार रसूलपुरा ता. रावेर जिल्हा जळगाव, या आरोपी विरुद्ध परतूर येथे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून आयशर टेम्पो क्रमांक एम. एच. २० ई एल ९१०७ हा जप्त करून कारवाई केली आहे, सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक मा. श्री. अजय कुमार बंसल, दादहरी चौरे, उप विभागीय पोलिस अधिकारी, परतूर यांच्या मार्गदर्शनाखाली एम.टी.सुरवसे, पोलिस निरीक्षक, भिमराव मुंढे, पो उप निरिक्षक ,सफौ/ खंदारे पोकॉ.दीपक आढे पोकॉ.अचुत चव्हाण पोकॉ.ज्ञानेशोर वाघ चालक पोह.धोत्रे यांनी केली आहे.

## ऑलिम्पिक स्पर्धेतील दर्जाचा स्विमींग पुल तयार करावा-पालकमंत्री



जालना। प्रतिनिधी

मराठवाड्याच्या शहरासह ग्रामीण भागातून उत्तम खेळाडू घडून त्यांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर राज्याचे आणि देशाचे प्रतिनिधीत्व करावे अशी माझी इच्छा आहे. तरी जिल्हा क्रीडा संकुलात उभारणी करण्यात येणारा स्विमींग पुल आकर्षक रचनेसह ऑलिम्पिक स्पर्धेतील दर्जाचा स्विमींग पुल तयार करण्यात यावा, असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.

जालना जिल्हा क्रीडा संकुल समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. याप्रसंगी त्या बोलत होत्या. या बैठकीस आमदार बबनराव लोणीकर, आमदार अर्जून खोतकर, आमदार संतोष दानवे, आमदार हिकमत उढाण, क्रीडा उपसंचालक युवराज नाईक, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता स्मिता पवार, यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, जिल्ह्यात क्रीडा संस्कृती वाढत आहे. विविध खेळामध्ये उदयोनमुख खेळाडू सराव करत आहेत. तसेच लगतच्या जिल्ह्यातील जलतरण स्पर्धेतील खेळाडूंना येथे संधी मिळेल असे पहावे. स्विमींग पुलाचे काम करत असतांना बालेवाडी येथील कॉमनवेल्थ स्पर्धेत वापरण्यात आलेल्या स्विमींगपुलचे प्रथमत: अवलोकन करावे. स्नानगृहाचा परिसर स्वच्छतेसह कोरडा राहील याप्रकारे उभारणी करावी. तसेच क्रीडा संकुलाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात येवून स्विमींग पुलासह इतर ठिकाणी वापरात येणाऱ्या पाण्याचा अपव्यय टाळावा. जिल्हा क्रीडा संकुलातील टप्पा-१ चे काम संपुर्ण करुन वापरात आल्यानंतर टप्पा -२ मधील ४०० मीटर सिथेंटीक ट्रॅक, नॅचरल ग्रास फुटबॉल मैदान, धावपट्टी तसेच मल्टीपर्पज सभागृहाचे कामकाज हाती घेण्यात यावे. असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी क्रीडा संकुलात करण्यात येणाऱ्या कामकाजाची सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

## परतुर दुय्यम निबंधक अधिकाऱ्याने कागदपत्रे तपासून रजिस्टरी करावी-मुख्याधिकारी

जालना । प्रतिनिधी

दुय्यम निबंधक कार्यालय परतुर संबंधित अधिकारी यांनी खरेदी विक्री व्यवहार करतांना गुंठेवारीच्या कागदपत्रांची तपासणी करून रजिस्टरी करण्यात यावे नसता नगरपालिका परतुर जबाबदार राहणार नाही करता दुय्यम निबंध कार्यालय परतुर यांना एका पत्राद्वारे कळविण्यात आले.

वरिल विषयास अनुसरून कळविण्यात येते की, नगर परिषद परतूर कार्यालयामध्ये गुंठेवारी प्रकरणा वाचत मा. नगर सेवक व नागरीकांच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. जसे की, नगर परिषद परतूर कार्यालया मार्फत गुंठेवारी प्रकरणांची कागदपत्रे न घेता इतरत्र कागदपत्र हस्तगत करून आपल्या कार्यालयास सादर करण्यात येत आहेत. त्या आधारे आपले कार्यालया मार्फत खरेदी विक्री व्यवहार होत आहे. सदरचा व्यवहार केल्यामुळे नगर परिषद परतूरचे नुकसान व नागरीकांची फसवणूक होत असल्याचे सदरच्या तक्रारीत नमूद केले आहे. तरी, आपण नगर परिषद परतूर कार्यालयाकडून देण्यात आलेल्या गुंठेवारी प्रकरणांचा खरेदी विक्री व्यवहार कागदपत्रांची पडताळणी / तपासणी करूनच करावा. गुंठेवारी प्रकरणा बाबत खोटी कागदपत्रे आपल्या कार्यालयात सादर करून खरेदी विक्री व्यवहार झाल्यास हे दुय्यम निबंधक कार्यालय जवाबदार राहील. याची नोंद घ्यावी, मुख्याधिकारी, नगर परिषद परतूर यांनी माहितीस्तव मा. जिल्हाधिकारी, जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर पालिका प्रशासन विभाग यांना कळविले

## माऊली विद्यालयात माता पालक मेळावा व तिळगुळ समारंभ

बीड। प्रतिनिधी

माऊली विद्यापीठ केज संचलित आदर्श बालवाडी व माऊली प्राथमिक विद्यालयात माता पालक मेळावा व तिळगुळ समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला यावेळी मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी माऊली विद्यापीठ केज चे संचालक मा.नवनाथ थोटे बापू होते तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून वात्सल्य हॉस्पिटल चे बालरोग तज्ञ डॉक्टर अजय जाधव,महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती.संध्या आयस्कर तसेच शाळेचे मुख्याध्यापक संतोष माने यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व सावित्रीमाई



फुले यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. यानंतर इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनींनी स्वागतगीताने उपस्थितांचे स्वागत केले स्वागत समारंभानंतर ऑलम्पियाड परीक्षेमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातुन सहशिक्षिका वंदना आवाड माता पालक मेळाव्याच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला.यानंतर प्रमुख अथिती संध्या आयस्कर व डॉक्टर अजय जाधव यांनी पालकांना मार्गदर्शन केले.प्रसंगी अजय जाधव यांनी विद्यार्थ्यांचे मानसिक,शारीरिक आरोग्य तसेच आहार याबाबत पालकांची भूमिका यावर चर्चासत्राच्या माध्यमातून मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतातून नवनाथ थोटे बापू यांनी पाल्यांच्या जडणघडणीत आईची भूमिका खूप महत्वाची आहे याविषयी मार्गदर्शन केले.यानंतर शाळेचे मुख्याध्यापक संतोष माने यांनी उपस्थित पालकांनी शिक्षक पालक संवादातून विद्यार्थ्यांची प्रगती कशी साधता येईल यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे असे मत मांडत उपस्थित पालक व मान्यवर यांचे आभार मानले.कार्यक्रमांचे सूत्रसंचलन सहशिक्षक रमाकांत डोळस यांनी केले यानंतर तिळगुळ कार्यक्रम संपन्न झाला प्रसंगी पालकांना जिजाऊ, सावित्रीमाई, अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनावरील पुस्तकांचे वाटप करण्यात आले.



बीड : महाराष्ट्रातील युवा व्याख्याते श्री विठ्ठल कांगणे बीड येथे एका कार्यक्रमानिमित्त आले असता त्यांचा दिनांक १ फेब्रुवारी २०२५ रोजी मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना डॉ. संजय तांदळे व बाजीराव ढाकणे दिसत आहेत.


# रेल्वे सुरक्षा आयुक्त निरुपयोगी रेल्वे पुलाची तपासणी करणार का?

## रेल्वे रुळ ओलांडताना ग्रामस्थांचे हाल - डॉ.गणेश ढवळे

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासाठी अत्यंत जिव्हाळ्याचा मुद्दा म्हणजे अहिल्यानगर - बीड - परळी रेल्वे मार्ग या वर्षात रेल्वे धावणार असून ४० वर्षापासून पाहिलेले बीडकरांचे स्वप्न साकार होणार असल्याने बीडकरांना रेल्वे चाचणी उत्सुकता आहे. यादरम्यान नवगणराजुरी ते बीड अशा १३ किलोमीटर अंतरावर रेल्वे रूळ अंथरण्याचे काम पूर्ण झाले असून जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात या मार्गावरील सुरक्षित चाचणी घेण्यात येणार असल्याची घोषणा गेल्या महिन्यात करण्यात आली होती.

याच धर्तीवर रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि सुविधांसाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा हे स्वतः ५ फेब्रुवारी रोजी राजुरी ते बीड स्थानकांदरम्यानची तपासणी करणार आहेत. बीड तालुक्यातील च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथील २ कोटी ७० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या आणि निरूपयोगी असलेल्या पुलाची पाहणी करणार का? संबंधित प्रकरणाची चौकशी करणार का? आणि शासनाची दिशाभूल व आर्थिक नुकसान प्रकरणी संबंधितांकडून नुकसान भरपाई वसूल करणार का? त्याच बरोबर याठिकाणी रेल्वे कर्मचाऱ्यांनी रेल्वे क्रॉसिंगच्या ठिकाणी आवश्यक उपाययोजना न केल्याने ग्रामस्थांचे हाल होत असुन याची दखल घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याच्या सुचना संबंधित आधिका-यांना देतील काय? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि शेख युनुस च-हाटकर, सुदाम तांदळे यांनी केला आहे.



# पत्रकारांच्या प्रश्नासाठी पुन्हा रस्त्यावर उतरणार- एस.एम.देशमुख

## सेलू येथे आदर्श जिल्हा, तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा व अध्यक्षांचा मेळावा उत्साहात

सेलु । प्रतिनिधी

पत्रकारांच्या प्रश्नासाठी मराठी पत्रकार परिषदेने सातत्याने पाठपुरावा केला. पत्रकारांच्या संरक्षणासाठी कायदा व्हावा, यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलने केली. अखेर सरकारने २०१७ मध्ये पत्रकार संरक्षण कायदा केला. पण प्रत्यक्षात या कायद्याची अंमलबजावणी होत नाही. कारण या कायद्याचे नोटिफिकेशन निघाले नाही. पत्रकार संरक्षण कायद्यासह सरकार पत्रकारांच्या इतर प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा मराठी पत्रकार परिषद राज्यभर रस्त्यावर उतरून पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी आंदोलन करणार आहे, असा इशाराच परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी दिला.

मराठी पत्रकार परिषद आयोजित रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा व अध्यक्षांचा मेळावा परभणी जिल्ह्यातील सेलू येथे एस.एम.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला. यावेळी देशमुख बोलत होते. याप्रसंगी परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, प्रमुख वक्ते तथा प्रसिद्ध निवेदक विशाल परदेशी, स्वागताध्यक्ष विनोद बोराडे, परिषदेचे कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूर शेख, राज्य प्रसिद्धीप्रमुख संदीप कुलकर्णी, सह प्रसिद्धीप्रमुख भरत निगडे, महिला आघाडी अध्यक्षा शोभाताई जयपूरकर, डिझिटल मीडिया प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, परिषदेचे उपाध्यक्ष प्रकाश कांबळे,उपाध्यक्ष गणेश मोकाशे विभागीय सचिव रवी उबाळे, सचिन शिवशेट्टे, अशोक काकडे, उप विभागीय अधिकारी संगीता सानप,माजी नगराध्यक्ष हेमंत आढळकर, परिषदेचे परभणी जिल्हाध्यक्ष प्रभू दिपके, परभणी जिल्हा सरचिटणीस मोहम्मद इलियास, बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा समन्वयक अभिमान्यु घरत,जील्हा प्रसिध्दी प्रमुख संजय हांगे ,तालुका सरचिटणीस प्रचंड सोळंके, यासह वडवणी,केज ,अंबाजोगाई, गेवराई,धारुर ,माजलगाव आदी तालुक्यासह सेलू तालुका पत्रकार संघ अध्यक्ष लक्ष्मण बागुल यांच्यासह राज्याच्या विविध भागातून आलेले पत्रकार उपस्थित होते.

राज्य सरकारने पत्रकारांसाठी पेन्शन योजना सुरू केली. आरोग्य योजना सुरू केल्या. पण प्रत्यक्षात या योजनांचा लाभ घेताना अनेक अडचणी येत आहेत, असे सांगतानाच देशमुख म्हणाले, समाजाच्या पत्रकारांकडून १०० अपेक्षा करतात. पण अडचणीच्या वेळात समाजाने देखील पत्रकारांच्या पाठीशी उभे राहावे, अशी अपेक्षा असते. मात्र पत्रकाराच्या अडचणीच्या काळात कोणी उभे राहत नाही. पण यापुढे महाराष्ट्रातील एकही पत्रकार एकाकी पडणार नाही, यासाठी मराठी पत्रकार परिषद काम करीत आहे. तशी रचनाच आपल्या संघटनेची आहे. मराठी पत्रकार परिषद ग्रामीण भागात पुरस्कार वितरण सारखे उपक्रम घेण्यामागे मोठा उद्देश आहे. कारण ग्रामीण जीवन, संस्कृती, प्रश्न यासर्वांची जाण पत्रकारांना होणे महत्त्वाचे आहे. राज्यातील ३५६ तालुक्यात आपल्या परिषदेचे अस्तित्व आहे. सामाजिक बांधीलकी जपत परिषद काम करीत आहे. पण ग्रामीण भागातील पत्रकारांचे प्रश्न तितक्याच ताकतीने मानण्याचे काम आता करणे गरजेचे असून याबाबत लवकरच परिषद भूमिका जाहीर करेल, असेही देशमुख यांनी सांगितले.

देशमुख पुढे म्हणाले, पत्रकार अधिस्वीकृतीचे नियम ग्रामीण भागातील पत्रकारांसाठी खूप कडक आहे. याबाबतीत विचार करण्याची वेळ आली आहे. त्यामुळेच पत्रकारांच्या हक्काची चळवळ पुढे नेण्यासाठी आगामी काळात अधिक व्यापकतेने, जोमाने परिषद काम करेल, असेही देशमुख यांनी स्पष्ट केले.

पान ३ वर





### असे आहेत पुरस्कार प्राप्त पत्रकार संघ

मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात येणारा स्व. वसंतराव काणे आदर्श पत्रकार संघ जिल्हा पुरस्कार अकोला जिल्हा पत्रकार संघाला देण्यात आला. तर आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार कणकवली तालुका पत्रकार संघ (कोल्हापूर विभाग), बुटीबोरी तालुका पत्रकार संघ (नागपूर विभाग), सेलू तालुका मराठी पत्रकार संघ (छत्रपती संभाजीनगर विभाग), पिंपरी चिंचवड तालुका पत्रकार संघ (पुणे विभाग), शहादा तालुका पत्रकार संघ (नाशिक विभाग) , उमरगा तालुका पत्रकार संघ ( लातूर विभाग), खामगाव प्रेस क्लब (अमरावती विभाग) , चिपळूण तालुका पत्रकार संघ (कोकण विभाग) यांना देण्यात आला.

### विशेष योगदान देणाऱ्या पत्रकारांचा कार्यगौरव

पत्रकारिता क्षेत्रांमध्ये विशेष योगदान देणाऱ्या पत्रकारांचा सेलू येथील कार्यक्रमांमध्ये गौरव करण्यात आला. यामध्ये आसारामजी लोमटे (साहित्यिक तथा ज्येष्ठ पत्रकार), डी व्ही मुळे (ज्येष्ठ पत्रकार), कांचनजी कोरडे (ज्येष्ठ पत्रकार) यांचा गौरव केला गेला. तर, सेलू येथील तरुणी शेख अलिना शेख मुनीर हिची इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये निवड झाल्याबद्दल तिचा सन्मान करण्यात आला.



माजलगाव:- महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना एकनाथ शिंदे,खा. श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगाव येथे भगव्या संपत्याचे आयोजन केले आहे. या सप्त्याचे माहिती महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांना देताना शिवसेना अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष सईद खान,माजलगाव शिवसेना शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके.

## समर्थांचे पादुकापूजन, व भिक्षाफेरीच्या स्वागतासाठी निघाली भव्य शोभायात्रा



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथे ३१ जानेवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान श्रीसमर्थ रामदासस्वामी सांप्रदायिक भिक्षाफेरी आणि चरणपादुकापूजन भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी सायंकाळी समर्थांच्या पादुकांचे स्वागत छत्रपती शिवाजीमहाराज चौकात झाले. यानिमित्ताने शहरातून भव्य शोभायात्रा निघाली.

राष्ट्रगुरु श्रीसमर्थ रामदासस्वामी यांच्या विचार व कार्याची महती अवघ्या महाराष्ट्राला परिचित आहे.

श्रीक्षेत्र सज्जनगडावरून श्रीरामदासस्वामी संस्थान तर्फे भिक्षा दौरा आयोजित केला जातो. हा भिक्षा दौरा ३१ जानेवारी ते ७ फेब्रुवारी या कालावधीत शहरातून फिरणार आहे. या निमित्ताने निघालेली शोभायात्रा छत्रपती शिवाजीमहाराज चौकातून निघाली.बस स्थानक,मंडी बाजार,पाटील चौक मार्गे शोभायात्रा पान ३ वर



माजलगाव : येथील कु.वैभवी टाकणखार हि प्रजासत्ताक दिनी दिल्लीतील पथसंचलना मध्ये सहभागी झाल्याबद्दल सत्कार करुन शुभेच्छा देताना पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे

## आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनूर येथील परिवर्तन सेवाभावी संस्थ्या संचलित मूकबधिर निवासी शाळा व अस्थिव्यंग निवासी विद्यालयात आ. सुरेश आण्णा धस यांच्या वाढदिवसानिमित्त एक आगळावेगळा सामाजिक बांधिलकी जपणारा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. आमदार मा.श्री सुरेश अण्णा धस यांच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांग मूकबधिर



व अस्थिव्यंग असलेल्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर या वस्तू मिळाल्यानंतर जो आनंद दिसत होता, तो कार्यक्रमाचे खरे यश ठरले..या कार्यक्रमासाठी नेकनूर येथील जेष्ठ नागरिक मा.श्री कल्याण आण्णा शिंदे, गावचे उपसरपंच मा.श्री. सचिन भैय्या शिंदे, ग्रामपंचायत सदस्य श्री. मुकुंदजी काळे, श्री. जयदीपजी काळे, बबलू शेट मेंबर, युवा नेते बाजीराव नाना काळे, श्री.सुभाष घोडके व श्री ऋषभ काळे उपस्थित होते.आ. सुरेश धस यांचे खंदे समर्थक मनोज बप्पा शिंदे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. त्यांनी यापुढेही असेच विविध कार्यक्रम दिव्यांग विद्यार्थ्यामध्ये येऊन साजरे करण्यात येणार आहेत असे सांगितले. विद्यार्थ्यांच्या पान ३ वर

## जय हिंद कॅम्पस बीडच्या शालेय फन फेअर कार्यक्रमाचे जल्लोषपूर्ण वातावरणात उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नामवंत जयहिंद कॅम्पसच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते यातीलच भाग म्हणून शालेय विद्यार्थ्यांना व्यवसायाची आवड निर्माण व्हावी यासाठी शिका व कमवा ही संकल्पना लक्षात घेऊन फन फेअर या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ३१ जानेवारी रोजी जय हिंद कॅम्पस



मिल्लत नगर बीड येथे करण्यात आले होते. सदरील फन फेअरचे उद्घाटन भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तात्या तांदळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश महामंत्री सलीम जहांगीर , मराठा आरक्षण मोर्चा समन्वयक गोपाल धांडे , मदरसा इमाम रब्बानीचे संचालक मुफ्ती अन्वर, सलाम एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटीचे सफी अनवरी , समाजसेवक खय्युम इनामदार आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सर्जेराव तांदळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना पान ३ वर

### *मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी संघटनेच्या निवडी जाहीर*

## तालुकाध्यक्ष गोविंद दळवी,उपाध्यक्ष अनंत घडसिंगे तर सचिवपदी अविनाश क्षीरसागर यांची निवड

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील शासकीय विश्रामगृह येथे मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत काम करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांची यांची बैठक संपन्न झाली.

यावेळी संघटनेच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. यावेळी बैठकीत मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी योजना अंतर्गत सर्व आस्थापना कार्यरत असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांच्या न्याय मागण्यासाठी आंदोलन उभे



करण्याचा ठराव सर्वानुमते पास करण्यातआला.यावेळीतालुकाध्यक्षपदि गोविंद दळवी उपाध्यक्षपदी अनंत घडसिंगे तर सचिवपदि अविनाश शिरसागर यांची निवड करण्यात आली.यावेळी पुढील कार्यकारणी निवडण्यात आली :- तालुकाध्यक्ष गोविंद दळवी, उपाध्यक्ष अनंत घडसिंगे , सचिव अविनाश शिरसागर, सुखदेव माने, सहसचिव नितीन काळे, जिब्रान शेख, कोषाध्यक्ष शरद पवार, लक्ष्मण पवार, सह कोषाध्यक्ष विनोद हांगे, पान ३ वर

## अंबाजोगाईत गणेश जयंती उत्साहात साजरी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाईच्या देशपांडे गल्लीतील पुरातन वरद विनायक मंदिरात गणेश जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी गणेश याग, महिलांच्या भजनाचा कार्यक्रम,अथर्वशिर्ष पठण श्री.गणेश अभिषेक असे विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले.भक्तांच्या उपस्थितीत मंत्र घोषाने फुले उधळुन गणेश जयंती साजरी करण्यात आली. परिसरातील महिला, नागरिक, युवक महाराष्ट्र सांस्कृतिक



गणेश मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सहकार दिंडीचे माजलगाव शहरात आगमन

माजलगाव । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त महाराष्ट्र राज्य पतसंस्था व मल्टीस्टेट फेडरेशन च्या वतीने महाराष्ट्रभर स्व. धनंजयराव गाडगीळ सहकार दिंडीचे आयोजन होत असून माजलगाव शहरामध्ये सदरील दिंडीचे आगमन दिनांक ०३ फेब्रु २०२५ रोजी होत आहे.


सदरील दिंडी प्रस्थान दुपारी ठीक ३.०० वाजता संभाजी चौक येथून होणार असून शिवाजी चौक,आंबेडकर चौक,मोंढा मार्गे वैष्णवी मंगल कार्यालय याठिकाणी सायंकाळी ७.०० वाजता थांबणार असून त्या ठिकाणी सहकार मेळावा होणार आहे.सदरील मेळाव्यामध्ये महाराष्ट्र पतसंस्था फेडरेशन चे अध्यक्ष श्री काकासाहेब कोयटे व मल्टीस्टेट फेडरेशन चे अध्यक्ष श्री सुरेशजी वाबळे सदरील दिंडी करीता उपस्थित राहुन सहकार क्षेत्रातील सर्व घटकांना मार्गदर्शन करणार आहेत.सहकार चळवळीस बळकटी निर्माण होऊन गती प्राप्त व्हावी करीता माजलगाव शहर व परिसरातील पतसंस्था,मल्टीस्टेट सेवा सहकारी सोसायटी चे अध्यक्ष,उपाध्यक्ष,संचालक ,कर्मचारी व नित्य निधी प्रतिनिधी सह सहकार क्षेत्रातील सर्व घटकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान सहकार दिंडी नियोजन समिती माजलगाव च्या वतीने करण्यात येत आहे.

# शेतकऱ्यांना सोयाबीनने मारले तर राजमा (घेवडा) पिकाने तारले

**दिनकर जाधव । सारणी**

चालू २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये शेतकऱ्यांना शेती पीक उत्पादनातून म्हणावा तसा फायदा मिळाला नाही, नव्हे शेती तोट्यातच गेल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. कारण मराठवाड्यासह केज तालुक्यात खरीपाच्या पिकामध्ये सोयाबीन हे मुख्य पीक आता शेतकरी घेऊ लागला आहे. परंतु चांगला भाव न मिळाल्याने यावर्षी खर्चही निघला नसल्याचे शेतकरी सांगतात. परंतु राजमा (घेवडा) या रब्बी पिकाने शेतकऱ्यांचा आर्थिक भार चांगल्या पद्धतीने उचलला असल्याचे दिसून येत आहे.

सोयाबीन पिकाला होणारा खर्च आणि त्याला सरकारकडून मिळणारा भाव पाहता शेतकऱ्यांना सोयाबीन उत्पादन आता तोट्यात जात असल्याचे दिसत आहे. परंतु याच शेतकऱ्यांच्या मदतीला आता राजमा (घेवडा) आला आहे. कारण सोयाबीन पीक निघल्यानंतर शेतकऱ्यांना राजमा (घेवडा) पीक मोठ्या प्रमाणात पेरणी करू लागले आहेत. आणि केवळ ७५ ते ८० दिवसांमध्ये निघणारे हे पीक आणि याला मिळणारा भाव शेतकऱ्यांना दिलासा देणारा आहे. कारण सध्या केज तालुक्यात ब्राझील घेवडा ९० ते १०० रुपये वाघ्या ८० ते ९० रुपये वरून ७० ते ८० रुपये प्रति किलो प्रमाणे व्यापारी खरेदी करत आहेत. याचे उत्पादनही एकरी आठ ते दहा क्विंटल निघत असल्याने शेतकऱ्यांना थोड्या दिवसात चांगले उत्पन्न निघत आहे. त्यामुळे शेतकरी आता रब्बी पिकामध्ये राजमा (घेवडा) या पिकाकडे जास्त वळला असून आपली आर्थिक समृद्धी साधताना दिसत आहे.



आम्हाला एकरी १० क्विंटल वरुण जातीचा राजमा निघाला आसून त्याला ७३ रु. प्रति किलो भाव मिळाला त्यामुळे हे पीक कमी खर्चात चांगले उत्पादन देणारे आहे. यामुळे शेतकऱ्यांना याचा चांगला फायदा होत आहे.

– शंकर जाधव शेतकरी सारणी (सां.) ता.केज

---

राजमा या वानाची महाराष्ट्राच्या बाहेर मागणी वाढल्याने शेतकर्यांना चांगला भाव मिळत आहे. त्यामुळे शेतकर्यांमध्ये समाधान पहावयास मिळत आहे.

– शिवराम काटे, व्यापारी, नांदुरफाटा

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सुसंस्कृत व सुदृढ महाराष्ट्र घडविण्यासाठी काम करावे- उदय सामंत

पुणे । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रामध्ये काम करुन त्या क्षेत्राचा नावलौकिक वाढविला पाहिजे. महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा जोपासून सुदृढ महाराष्ट्र घडविण्यासाठी काम करावे, असे मत उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केली. डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठातर्फे आयोजित नवव्या पदवीप्रदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.



यावेळी विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार जैन उपस्थित होते. यावेळी उदय सामंत यांच्यासह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा मानद डॉक्टरेट (डी. लिट) देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये प्रा. डॉ. निशाकांत ओझा, डॉ. रचना बुक्सानी-मिरपुरी, महाराज कुमार डॉ. लक्ष्यराज सिंग, अमित धमानी, नवाब शाजी उल मुल्क या मान्वरांना डी. लिट प्रदान करण्यात आली. त्याचबरोबर अभियांत्रिकी, डिझाइन, चित्रपट, माध्यम, कायदा, लिबरल आर्ट्स, हॉटेल व्यवस्थापन आणि वास्तुकला अशा विविध शाखांमधील एक हजार हून अधिक विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. परदेशात राहणाऱ्यांना मराठी शिकविण्यासाठी अजिंक्य डी.वाय.पाटील विद्यापीठातर्फे अभ्यासक्रम तयार केला जाणर आहे. शिक्षण संस्था चालकांची सकारात्मक मानसिकता असेल, तर सुसंस्कृत, सुदृढ महाराष्ट्र घडण्यासाठी वेळ लागणार नाही, असा विश्वासही सामंत यांनी व्यक्त केला. नव्या तंत्रज्ञानाची आव्हाने स्वीकारण्यासाठी विद्यार्थ्यांनी तयार राहायला हवे. यासाठी इनोव्हेटिव्ह विचार करावा लागेल. विविध प्रकारची कौशल्ये मिळवावी लागतील, असे डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील यांनी स्पष्ट केले.

### मानद डॉक्टरेट मिळाल्याने उदय सामंत भावुक

डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट प्रदान झाल्यावर मंत्री उदय सामंत भावुक झाले. मी डॉक्टर व्हावे अशी माझ्या आई - वडीलांची इच्छा होती. आजपासून माझ्याही नावासमोर डॉ. लागणार आहे. माझ्या राजकीय आणि सामाजिक जीवनाची नोंद घेऊन मानद डॉक्टरेट प्रदान करून सन्मान केल्याचा आनंदही सामंत यांनी व्यक्त केला.

## लग्नास नकार देत पोलिसानं केली महिलेची फसवणूक

### पोलिस कर्मचाऱ्याचं निलंबन, ५ लाखांसह सोन्याच्या दागिन्यांचा केला अपहार

पुणे । प्रतिनिधी

महिलेची फसवणूक केल्याप्रकरणी पुणे पोलिस दलातील कर्मचाऱ्याचे निलंबन करण्यात आलं आहे. संबंधित महिलेला लग्नास नकार देत पोलिस कर्मचाऱ्याने फसवणूक केली आहे. महिलेसोबत नातं ठेवत तिच्या पतीच्या विमा पॉलिसीचे ५ लाख व सोन्याच्या दागिन्यांचा अपहार केला आहे. याप्रकरणी पुण्यातील समर्थ पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तुषार अनिल सुतार असे या पोलीस शिपायाचे नाव असून तो खडक पोलीस ठाण्यात नेमणूकीला होता. दरम्यान, एका आठवड्यात पुणे पोलिस दलातील दुसरा पोलिस कर्मचारी निलंबित झाला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, याप्रकरणातील फिर्यादी महिला त्यांच्या कुटुंबासह रास्ता पेठेत वास्तव्यास होत्या. ४ वर्षांपूर्वी तुषार सुतार याच्याबरोबर सोशल मीडियावरून त्यांची ओळख झाली आणि त्याचे रूपांतर प्रेमात झाले. फिर्यादी महिला व तुषार यांच्याबाबत पतीला कळल्या नंतर पतीने त्या महिलेला घराबाहेर काढले. तुषार व फिर्यादी महिला तिच्या मुलीसह सुमारे तीन वर्षे आंबेगाव येथे एकत्र रहात होते. त्यानंतर २०२१ मध्ये फिर्यादी महिलेच्या पतीचे निधन झाले. त्यानंतर त्याच्या पॉलिसीचे ९ लाख रुपये या महिलेला मिळाले. या पैशांपैकी तुषार याने वेगवेगळी कारणे सांगून तिच्याकडून ५ लाख रुपये व २२ ग्रॅम सोन्याचे दागिने घेतले. दरम्यान, फिर्यादी महिलेनं तुषार यांच्याकडे लग्नाबाबत विचारणा केली असता त्याने वेगवेगळी कारणे देत टाळाटाळ केली. काही काळानंतर सुतार यांनी तिला मारहाण व शिवीगाळ करुन लग्नास नकार दिला. अखेर तिने समर्थ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यामुळं तुषार सुतार याचे निलंबन केलं आहे. पोलिस उपायुक्त संदीप गिल यांनी या कर्मचाऱ्याचे निलंबन केले आहे.

## मराठीसाठी आमच्या पद्धतीने जे काही करू त्याला साथ द्या, आमच्यावर केसेस टाकू नका ; राज ठाकरेंचं आवाहन

पुणे : तुम्ही तुमची भाषा जपली पाहिजे, मराठीचं अस्तित्व टिकलं पाहिजे. जिथे जिथे म्हणून मराठी जपता येईल तिथे जपली पाहिजे. तरच जग आपली दखल घेईल असं आवाहन मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केलं. मराठी माणसाने जातीपातीमध्ये न अडकता मराठी म्हणून एकत्र आलं पाहिजे असंही ते म्हणाले. त्यावेळी मराठी भाषेसाठी जे जे कराल त्याला पाठिंबा असल्याचं राज्याचे मंत्री उदय सामंत म्हणाले. तोच धागा पकडत राज ठाकरे यांनी त्यांना आवाहन केलं. आम्ही मराठीसाठी जे जे करू त्यालाही पाठिंबा द्या, तेव्हा फक्त केसेस टाकू नका. आमची कामाची पद्धत वेगळी असते असं राज ठाकरे यांनी म्हटलं. पुण्यातील विश्व मराठी साहित्य संमेलन सांगता कार्यक्रमात ते बोलत होते.



राज ठाकरे म्हणाले की, आपल्या महापुरूषांना आपण मोठं केलं पाहिजे, त्यांना जातीपातीमध्ये अडकवू नका. महाराष्ट्र हा मराठी म्हणून एकत्र येणं गरजेचं आहे. बाकीचे राज्ये जशी त्यांची भाषा म्हणून एकत्र येतात तसे मराठी एकत्र आले पाहिजेत. कावेरीच्या प्रश्नावर तामिळनाडूतील राजकीय नेते, साहित्यिक, अभिनेते हे सगळेच एकाच व्यासपीठावर येतात. मग महाराष्ट्रामध्ये हे का शक्य नाही? ज्यावेळी मराठी माणूस एकत्र येईल त्यावेळी मराठी भाषा आणि मराठी माणसाला हात लावायला कुणी धजावणार नाही.

राज ठाकरे म्हणाले की, आपण आपल्या भाषेवर ठाम असलं पाहिजे. त्यानंतर जग तुम्हाला दाद देतं. फ्रेंच असो वा अनेक देश असोत, ते त्यांच्या भाषेबद्दल प्रामाणिक असतात. आपल्या देशातही अनेक राज्ये आहेत त्या ठिकाणी त्यांच्या भाषेत बोललं जातं. 'जय जय महाराष्ट्र माझा' हे आपलं राज्यगीत. स्वतःचं राज्यगीत असलेलं महाराष्ट्र हे एकमेव राज्य. संपूर्ण हिंद प्रांतावर मराठ्यांनी राज्य केलं. इतर राज्यकर्ते होते ते बाहेरून आलेले. राज ठाकरे म्हणाले की, सदानंद मोरे यांची व्याख्याने ऐका, त्यावेळी समजेल मराठी असणं म्हणजे नेमकं काय आहे. माणसाचे अस्तित्व हे जमिनीवर असतं. इतिहास म्हणजेच भूगोल आहे. अनेकांनी प्रदेश मिळवण्यासाठी आक्रमणं केली आणि त्यानंतर इतिहास घडला. तुमच्या पायाखाली जमीन राहिली नाही तर इतिहासही राहणार नाही. नुसत्याच प्रगतीच्या नावावर जमिनी जाणार असतील आणि आमचीच लोक बेघर होणार असतील तर आपलं अस्तित्व राहणार नाही. एखाद्या कंपनीने परिसरातील पाच हजार एकर जमीन विकत घेतली तर त्या ठिकाणचे लोक बाहेर फेकले गेले. इतिहासातून आपण काही बोध घेणार नसू तर इतिहास न वाचलेलाच बरा. मराठी भाषेसोबतच मराठी माणसाचं अस्तित्व टिकवण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न करावे असं सांगत राज ठाकरे म्हणाले की, ३७० कलम हे काश्मीरमधून रद्द झालं. म्हणजे भारतीय माणूस त्या ठिकाणी जमीन घेऊ शकतो. पण आतापर्यंत किती लोकांनी काश्मीरमध्ये जमिनी घेतल्या? हे फक्त काश्मिरपुरतं नाही. तुम्ही हिमाचल प्रदेशमध्ये जमिनीचा तुकडा घेऊ शकणार नाही. आसाम, मणिपूरमध्येही जमीन घेऊ शकणार नाही. मग आम्हीच का मोकळीक दिलीय. आमचं अस्तित्वच नसेल तर भाषा काय टिकणार? आपण प्रत्येक गोष्टीमध्ये कात टाकतोय आता साहित्यिकांनीही कात टाकली पाहिजे असं राज ठाकरे म्हणाले. साहित्यिकांनी राजकीय विषयावर बोललं पाहिजे, मत मांडलं पाहिजे. हे सध्या दिसत नाही. साहित्यिक बोलायला लागले तर लोक ऐकायला लागतील आणि त्यांची पुस्तकंही वाचली जातील. समाजात चांगलं काय आणि वाईट काय हे साहित्यिकांनी सांगितलं पाहिजे असं राज ठाकरे म्हणाले.

## भुजबळांनी घेतला भिडेवाडा आणि फुलेवाड्यातील स्मारकांचा आढावा, 'पुनर्वसनाचा प्रश्न सोडवू'

पुणे: क्रांतीसुर्य महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाच्या कामात कुठे अडचणी येऊ देणार नाही आणि अडचणी आल्याच तर मी स्वत: त्याचा पाठपुरावा करेल असे प्रतिपादन ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी पुणे येथे केले.



पुणे दौऱ्यावर असताना छगन भुजबळ यांनी भिडेवाडा येथे सुरू असलेल्या स्मारकाच्या आणि फुलेवाडा येथील स्मारकाच्या विस्तारिकरणाच्या कामाचा आढावा घेतला यावेळी ते बोलत होते. यावेळी ते म्हणाले, भिडे वाडा येथे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पहिली मुलींची शाळा सुरू केली. याठिकाणी स्मारक होण्यासाठी अनेक वर्ष गेली. मात्र मोठा संघर्ष उभा करून आम्ही ही लढाई जिंकली आणि त्या ठिकाणी आता स्मारक उभे राहत आहे. या स्मारकाच्या बाबतीत आढावा घेण्यासाठी आणि याच्या कामाची माहिती घेण्यासाठी आज पुण्यात आलो असल्याचे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले की, फुले वाड्याचा देखील आपण विस्तार करत आहोत महात्मा फुले राहत असलेला वाडा आणि सावित्रीबाईंचे तयार केलेले स्मारक एकत्र करून त्या ठिकाणी आपण भव्य स्मारक तयार करणार आहोत. यासाठी तिथे असलेले काही रहिवाशी आणि भाडेकरू यांच्याशी चर्चा करून हा प्रश्न लवकरच मार्गी लावणार आहोत. या ठिकाणी ५१६ मालक २०० भाडेकरू असल्याची माहिती आहे. मात्र त्यांचे योग्य ते पुनर्वसन करूनच हा प्रश्न मार्गी लावणार आहोत. विस्तारीकरणासाठी सरकारने दोन दिवसापूर्वीच निधी जाहीर केला आहे. या कामाला गती मिळाली असून या कामाचा देखील सतत आम्ही पाठपुरावा करतच राहू असेही ते म्हणाले. यावेळी स्थानिक नागरिकांशी संवाद साधताना छगन भुजबळ म्हणाले की, स्थानिकांचा पुनर्वसनाचा प्रश्न सोडवून आपण विस्तारीकरण करणार आहोत. महापालिकेच्या वतीने स्थानिकांसाठी अनेक पर्याय उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामुळे महापालिकेचे अधिकारी आणि स्थानिक आमदार हेमंत रासने हे लवकरच सर्वांशी चर्चा करून यामध्ये तोडगा काढतील असा विश्वास देखील यावेळी त्यांनी व्यक्त केला.

## वडिलांचा खून करणाऱ्या मुलास जन्मठेप

उरुळी कांचन । प्रतिनिधी

पत्नीवर वाईट नजर ठेवल्याच्या रागातून ऊस तोडण्याच्या कोयत्याने वडिलांवर वार करून त्यांचा खून करणाऱ्या मुलास जिल्हा व सत्र न्यायाधीश पी. पी. जाधव यांनी जन्मठेपेसह २५ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास तीन महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

सचिन अंबादास खोत (रा. उरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे) असे न्यायालयाने शिक्षा केलेल्या मुलाचे नाव आहे तर अंबादास दिगांबर खोत असे खून झालेल्या त्याच्या वडिलांचे नाव आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, पत्नीवर वाईट नजर ठेवल्याच्या रागातून आरोपी सचिन खोत याने वडील अंबादास खोत यांच्यावर २९/१०/२०१४ रोजी रात्री ऊस तोडण्याच्या लोखंडी कोयत्याने वार केले. या हल्ल्यात वडिलांचा मृत्यू झाला. याप्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी सचिन खोत याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा सहाय्यक पोलीस निरीक्षक रणजितसिंग यांनी सखोल तपास आरोपी विरोधात न्यायालयात सबळ पुराव्यासह आरोपपत्र दाखल केले होते. या प्रकरणाची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश पी. पी. जाधव न्यायालयात झाली. अतिरिक्त सरकारी वकील नामदेव तरळगट्टी यांनी न्यायालयात सरकार पक्षातर्फे बाजू भक्कमपणे मांडली. पुरावे सादर केले. न्यायालयाने पुराव्याची पडताळणी करून आरोपी सचिन खोत याला जन्मठेप व २५ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास तीन महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पूर्व प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, परिमंडळ ०५ चे पोलीस उप आयुक्त डॉ. राजकुमार शिंदे, हडपसर विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले, वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस हवालदार ललीता कानवडे यांनी सर्व साक्षीपुरावे वेळेत सादर केले.

## श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती मंदिरात 'श्री गणेश जन्मसोहळा' उत्साहात साजरा

**पुणे । प्रतिनिधी**

हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती अशी ओळख असलेल्या 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट' येथे प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही माघ शुध्द चतुर्थीला गणेश जन्म सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने गणेशयाग, अथर्वशीर्ष पठण, भजन सेवा अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



गणेश चतुर्थीनिमित्त मंदिराला फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. सकाळी सात वाजता यज्ञ करण्यात आला. यावेळी सरस्वती भजनी मंडळाने सादर केलेल्या भजनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. दुपारी बारा ते एक या दरम्यान अथर्वशीर्ष पठणाचे आयोजन करण्यात आले होते.

तर सायंकाळी आकर्षक सजावटीसह गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोश करत आणि फुलांची उधळण करीत गणपती पालखी (नगर प्रदक्षिणा) सोहळा संपन्न झाला. सायंकाळी पुणे महानगर संघचालक रविंद्र वंजारवाडकर यांच्या हस्ते श्रींची महाआरती करण्यात आली, याप्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष संजीव जावळे यांच्यासह विश्वस्त, कार्यकर्ते व गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मूषकाची फुलांनी आकर्षक सजावट

'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती मंदिरा'त श्री गणेशाचे वाहन असणाऱ्या मूषकाची फुलांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. बाप्पाच्या मूर्तीच्या दोन्ही बाजूनी जास्वंदीच्या पांढऱ्या फुलांनी आणि गुलाब पाकळ्यांनी साकारलेले मूषक भाविकांचे लक्ष वेधून घेत होते. त्यापुढे सूर्यफुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

## महाराष्ट्राचा यंदाचा अर्थसंकल्प जनतेचा विश्वास सार्थ ठरवेल : अजित पवार

माळेगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्राचा यंदाचा अर्थसंकल्प जनतेचा विश्वास सार्थ ठरवेल. त्यामध्ये शेतकरी, मध्यमवर्गीय, महिला, विद्यार्थी, उद्योजकांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविसांच्या अधिपत्याखालील सादर होणार अर्थसंकल्प जमेचा ठरणार आहे. याशिवाय यंदाच्या बजेटमध्ये शेती आणि शेतीपुरक व्यवसायाला अधिक चालना देण्यासाठी आर्टीफिशल इंटॅलिजन ( एआय) तंत्रज्ञान विकसित होण्यासाठी पथदर्शी प्रकल्पाला पुरेशी तरतुद केली जाईल, अशी माहिती स्पष्ट करीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाची दिशा स्पष्ट केली.



शिरष्णे (ता.बारामती) येथे श्री स्वामी समर्थ सहकारी दूध उत्पादक संस्थेने नव्याने उभारलेल्या दूध बल्क कुलरच्या उद्घाटन प्रसंगी अजित पवार बोलत होते. देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पातील तरतूदीचा महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने आणि विशेषतः मध्यमवर्गींच्या भल्यासाठी निर्णायक ठरणार आहे, असे सांगून अजित पवार म्हणाले, ऋऋ मी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात घेतलेल्या निर्णयांचे स्वागत करतो.केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्रातील पायाभूत प्रकल्पांना भरीव निधी मिळाला आहे.

प्रधानमंत्री मोदी साहेब यांचे यावरून महाराष्ट्रावर विशेष लक्ष असल्याचे दिसून येते. ज्येष्ठ नागरिकांसाठी टीडीएस मर्यादा ५० हजारांहून १ लाख करण्याचा निर्णयही स्वागतार्ह आहे. कॅन्सर आणि इतर गंभीर आजारांवरील ३६ जीवनावश्यक औषधांवरील सीमाशुल्क संपूर्ण माफ केल्यानं ही औषधं स्वस्त होणार आहेत. महाराष्ट्र हे शिक्षण, उच्च आणि तंत्रशिक्षणाच्या क्षेत्रात अग्रेसर राज्य आहे.

ऊस शेतीवर कृत्रिम बुद्धीमत्तेची (एआय) भूमिका वरदान ठरणार आहे, असे सांगून पवार म्हणाले की बहुमतांशी साखर कारखान्यांची गाळप क्षमता वाढलेली आहे आणि उसाच्या क्षेत्रातील उत्पन्न मात्र घटत चालले आहे. त्यामुळे यापुढील काळात कमी खर्चात आणि कमी क्षेत्रात अधिक उत्पन्न काढणे खूप महत्वाचे आहे. त्यासाठी यापुढे एआय तंत्रज्ञान शिवारात विकसित करणे खूप महत्वाचे आहे. यासंबंधी ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्रात मोठे काम उभे झाले आहे. या तंत्रज्ञानामुळे एकरी दीडशे टन ऊस उत्पन्न मिळू शकते, असे प्लॉट राज्यातील शेतकऱ्यांना कृषिक प्रदर्शनाच्या माध्यमातून पहावयास मिळाले आहेत. अर्थात या प्रक्रियेला चालना देण्यासाठी येणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये भरिव तरतूद करण्याचा माझा विचार आहे. त्यासाठी सोमवार (ता.३) रोजी मुंबई-मंत्रालयात कृषीसह संबंधित विभागाची बैठक बोलविली आहे.

## निगडी प्राधिकरणातील उच्चभ्रू वस्तीमध्ये बिबट्याची एन्ट्री वनविभाग अन् रेस्क्यू टीमकडून बिबिट्या जेरबंद

पुणे : पिंपरी-चिंचवडमधील निगडी याठिकाणी बिबट्याने एंट्री केली आहे . मात्र याबाबत माहिती मिळताच वनविभाग अन् रेस्क्यू टीमकडून बिबिट्या जेरबंद करण्यात आले आले. पुणे वन विभाग, रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट (RESQ CT), PCMC पोलीस आणि अग्निशमन दल यांनी तातडीने आणि समन्वयाने बचाव मोहीम राबवली.



आज निगडित सकाळी वनाधिकाऱ्यांना परिसरात बिबट्या दिसल्याची माहिती मिळाली. त्यांनी तातडीने रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापक आणि अध्यक्ष नेहा पंचमिया यांना याबाबत माहिती दिली. त्यांनी रेस्क्यू टीमला त्वरित घटनास्थळी पाठवले. टीम घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचे आकलन केले आणि बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवले. बिबट्या सुरुवातीला सार्वजनिक उद्यानात दिसला होता, पण त्यानंतर एक बंद घराच्या आवारात प्रवेश केला. शोध घेतल्यावर बिबट्या त्या घराच्या मागील भागात एका टिनच्या शेडच्या मागे लपल्याचे दिसून आले. पुणे वन विभाग, रेस्क्यू उढ टीम आणि पीसीएमसी पोलीस यांनी अत्यंत काळजीपूर्वक पुढे जाण्याचा प्रयत्न केला, पण बिबट्याने उडी घेत एका खोलीच्या बाहेर गडद भागात लपला, ज्याठिकाणी घरात एक महिला आणि दोन युवक होते. दरम्यान ,योग्य आणि वेळीच कारवाई करण्याची गरज ओळखून, ठएब्ट उढ चे पशुवैद्यक डॉ. कल्याणी ठाकूर यांनी सुरक्षितपणे बिबट्याला ट्रॅंक्विलाइझ (बेशुद्ध) केले. औषधाचा परिणाम होताच, बिबट्याला काळजीपूर्वक बाहेर काढून रेस्क्यू म्ब्युलन्समध्ये टाकण्यात आले आणि वैद्यकीय तपासणीसाठी हलवण्यात आले. बिबट्या निरोगी नर असल्याचे आढळून आले असून, तो सध्या बावधन येथील वन्यजीव संक्रमण उपचार केंद्रात वैद्यकीय तपासणीखाली आहे, असे रेस्क्यू उढ, पुणे यांच्या संस्थापक नेहा पंचमिया यांनी सांगितले.